# संतांचे चमत्कार


एखादी घटना कशी घडली, याची विवेचक उपपत्ति आपल्याला लावतां आली नाहीं, म्हणजे त्या घटनेला आपण 'चमत्कार' म्हणतों. संतांच्या चरित्रांत अशा चमत्कार कथा आपल्याला पुष्कळ आढळून येतात. त्यामुळें पुष्कळदां, जो चमत्कार करतो तो संत, अशी व्याख्या आपण आपल्या मनाशीं बनवून ठेवीत असतों. पण वस्तुतः ही चूक आहे. एखादा पुरुष हा संत आहे कीं नाहीं हें ठरविण्याची कसोटी अगदीं वेगळी आहे. ईश्वरावर अनन्यनिष्ठा, सच्छील वर्तन, सर्वभूतीं दया इत्यादि साधुत्वाचे गुण ज्याच्या आंगीं प्रकर्षानें आढळून येतात तो खरा संत होय. मग त्यानें संबंध जन्मांत चमत्कार केलेला नसला तरी हरकत नाहीं. चमत्कार करतात म्हणून संत श्रेष्ठ ठरत नसून आपल्या अंगच्या इतर दैवी गुणांनीं ते श्रेष्ठ ठरतात. चमत्कार ही त्यांच्या चरित्रांतील अगदीं गौण गोष्ट असते. चमत्कारांसाठीं ते चमत्कार करीत नसून केवळ परोपकारार्थ त्यांच्या हातून चमत्कार घडत असतात.

अशा श्रेष्ठ संतांच्या जीवनांतील कांहीं चमत्कार-कथा पुढें दिल्या आहेत.

## बाबांचें अतींद्रिय सामर्थ्य

श्रीसाईबाबा यांना अतींद्रिय सामर्थ्य प्राप्त झालें असल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. एकाच क्षणाला निरनिराळे देह धारण करून त्यांनीं भक्ताला दर्शन दिल्याचे अनेक अनुभव आहेत.

एके दिवशीं शिरडीला सर्व भक्तमंडळींनीं रात्रीं नेहमींप्रमाणें बाबांची शेजारती केली. दुसरे दिवशीं ती सर्व मंडळी पुन्हा दर्शनास गेली असतां बाबा म्हणाले, 'काल मी दक्षिण दिशेला फिरावयास गेलों होतों.' बाबांच्या बोलण्याचा अर्थ प्रथम कोणाच्याच लक्षांत आला नाहीं. नुसतें आश्चर्य करीत ती मंडळी गप्प बसली. थोड्याच वेळांत दक्षिणेच्या बाजूच्या एका खेड्यांतून एक मनुष्य दर्शनास आला व सांगूं लागला 'काल संध्याकाळीं बाबा आमच्या गांवांत आले होते.' तेव्हां बाबांच्या म्हणण्याचा अभिप्राय लोकांच्या ध्यानीं आला. जागृतावस्थेंत व एरवीं निरनिराळे देह धारण करून बाबा भक्तांना दर्शन देत असल्याच्या अनेक गोष्टी प्रसिद्ध आहेत. एका रात्रीं श्री. बळवंतराव खापर्डे यांच्या स्वप्नांत साईबाबा आले व भोजन करून स्वस्थपणें झोंपाळ्यावर बसून विडा खाऊन निघून गेले. नंतर घरच्या मंडळींच्या आग्रहावरून कुणासहि ही हकीकत न सांगतां बळवंतराव बाबांच्या दर्शनास



रोम रगडतील संपूर्ण । यालागीं न करी अंगमर्दन ॥ एवं स्वदेहाचें देहपण । भूतहिंसे भेणें अहंत्वा नाणी ॥

गेले. त्यांना पाहतांक्षणींच बाबा म्हणाले, 'काल तुमच्या घरीं पोटभर जेवलों, पण नंतर दक्षिणा दिली नाहींस !' त्यांनीं खापर्ड्यांकडून नंतर दक्षिणा घेतली.

एकदां काकासाहेब दिक्षित सकाळीं स्नानसंध्या करून ध्यानस्थ बसले असतां त्यांना पंढरीच्या विठोबाची सांवळी मूर्ति पाहिल्याचा भास झाला. आपला जप पुरा झाल्यावर काकासाहेब द्वारकामाईंत बाबांच्या दर्शनास गेले. त्यांच्याकडे पाहून बाबा हंसून म्हणाले, 'काय रे, विठ्ठल पाटील आला होता ना ? त्याला नीट पाहिलेंस ? तो फार पळपुट्या आहे. त्याला चांगला घट्ट धरून ठेव. नाहींतर तुझ्या हातावर तुरी देऊन तो पळून जाईल।' बाबांचे हे उदगार ऐकतांच दीक्षितांचें मन विस्मय आणि आदर यांनीं भरून गेलें.

× × ×

## मुकुंदराज आणि राजा जयत्पाळ

मुकुंदराज हा मराठींतील आद्यकवि समजला जातो. याच्या विवेकसिंधु या ग्रंथांत राजा जयत्पाळ याचा उल्लेख आहे. हा जयत्पाळ मोठा ईश्वरभक्त होता. पण खूप साधना करूनहि त्याला ईश्वरदर्शन झालें नव्हतें. त्यामुळें तो थोडा भ्रमिष्टासारखा वागूं लागला. जो कोणी साधु आपल्या नगरींत येईल त्याला राजा बोलावून नेई आणि 'मला साक्षात्कार कसा होईल तें सांगा' असा त्याला आदेश देई. शेंकडों सत्पुरुष याप्रमाणें राजाकडे येऊन गेले, परंतु राजाचें समाधान कोणी करूं शकला नाहीं. ते शाब्दिक ज्ञान पुष्कळ सांगत; पण अनुभवाची गोष्ट एकालाहि बोलतां आली नाहीं! राजा अखेर अत्यंत रागावला आणि या सर्व साधूंना व शास्त्री–पंडितांना त्यानें एका तलावाच्या कामावर मजूर म्हणून कामास जुंपलें !

एकदां मुकुंदराज या तलावाच्या कामाच्या ठिकाणीं आले. ब्राह्मण मजूरकाम करीत असलेले पाहून त्यांनीं विस्मयानें त्याचें कारण विचारलें. ब्राह्मणांनीं आपली हकीकत त्यांना सांगितली. त्यावर मुकुंदराज म्हणाले, 'मला तुमच्या राजाकडे घेऊन चला.'

ब्राह्मण म्हणाले, 'आम्ही काम सोडून तुमच्याबरोबर कसे येऊं ? तसें केलें तर आम्हांला राजसेवक मारतील.'

मुकुंदराजांनीं त्याना निर्भय राहण्याचें आश्वासन दिलें आणि ब्राह्मणांना बरोबर घेऊन ते राजवाड्याकडे निघाले. राजसेवकांनीं ब्राह्मण काम टाकून चाललेले पाहातांच त्यांना अडविलें. मुकुंदराज सेवकांना म्हणाले, 'तलावाचें काम तर चालू आहे. मग ब्राह्मण माझ्याबरोबर आले म्हणून काय बिघडलें ?'

हें ऐकून सेवक तलावाच्या दिशेला पाहतात तों त्यांना कुदळीं व फावडीं आपोआप जमीन खणीत आहेत आणि पाट्या आपोआप माती भरून टाकीत आहेत असें दिसलें! तेव्हां ते विस्मयचकित झाले आणि धांवत जाऊन त्यांनीं राजाला हा चमत्कारिक वृत्तांत सांगितला.

राजानें मुकुंदराजांस सन्मानानें राजवाड्यांत नेलें. मुकुंदराज जयत्पाळाला म्हणाले, 'सच्छील ब्राह्मणांचा अशा रीतीनें छळ करणें योग्य नव्हे.'

त्यावर जयत्पाळ म्हणाला, 'माझा यांत कांहीं दोष नाहीं. आत्मज्ञान कसें होईल याचा अनुभवगम्य मार्ग मीं यांना विचारला. एकालाहि त्याचें उत्तर देतां आलें नाहीं. खरें ज्ञान नसतां ज्ञान आहे असें भासवून साधुत्वाचें ढोंग मात्र हे लोक करतात. म्हणून मीं त्यांना ही शिक्षा दिली आहे.'

मुकुंदराज म्हणाले 'मी तुला आत्मज्ञानाचा मार्ग सांगतों. पण प्रथम या ब्राह्मणांना मुक्त कर.'

मग मुकुंदराज राजाच्या अश्वशाळेंत गेलें आणि तेथील उत्तम घोडा आणवून राजाला म्हणाले 'या घोड्यावर बस! मी तुला उपदेश देतों.'

राजानें घोड्यावर बसण्याकरतां रिकिबींत पाय ठेवला मात्र तों मुकुंदराजांनीं हातांतल्या छडीनें त्याच्यावर सपासप कोरडे ओढण्यास सुरवात केली! बावन्न कोरडे पाठींत बसतांच राजाची समाधि लागली! मुकुंदराजांनीं नंतर त्याला केलेला उपदेश अभंग-रूपानें प्रसिद्ध आहे.

× × ×

## दासोपंत आणि बेदरचा बादशहा

मुकुंदराज हा काळाच्या दृष्टीनें मराठींतील पहिला कवि, तर दासोपंत हा ग्रंथसंख्येच्या दृष्टीनें पहिल्या क्रमांकाचा कवि आहे. मराठींतच नव्हे तर जगांतील कोणत्याहि भाषेंत दासोपंताइतकी विपुल कविता कोणीहि लिहिलेली नाहीं असें म्हणतात!

दासोपंतांचे वडील दिगंबरपंत हे नारायणपेठ महालाचे देशपांडे होते. महालाचा वसूल प्रतिवर्षी गोळा करून बेदरच्या बादशहाकडे पाठविण्याचें काम त्यांच्याकडे होतें. एका वर्षी तेथें मोठा दुष्काळ पडला आणि बादशहाकडे रक्कम पाठवितां आली नाहीं. तेव्हां बादशहानें दिगंबरपंतास पकडून बेदरला आणविलें. 'अमुक मुदतींत महसुलाचा भरणा केला नाहींस तर तुझ्या मुलाला—दासोपंताला—मुसलमान धर्माची दीक्षा देईन' अशी बादशहानें दिगंबरपंतास ताकीद दिली आणि त्याला जाऊं दिलें. दासोपंताला मात्र त्यानें नजर कैदेंत ठेवलें.

दासोपंत दिसायला अत्यंत देखणा होता. त्याला मुसलमान बनवून आपल्या-मागें आपल्या राज्याचा कारभार त्याच्यावर सोंपवावा अशी बादशहाची इच्छा होती.

दासोपंत बेदरला असतांना 'झरणी—नृसिंह' नांवाच्या क्षेत्रावर ते रोज स्नानास येत असत. त्यांना भोजनखर्चासाठीं बादशाही खजिन्यांतून रोज एक रुपया मिळे. पण दासोपंत तो रुपया ब्राह्मणांना देऊन टाकीत व स्वतः ईश्वरचिंतन करीत उपाशीच राहात! ईश्वरी कृपेचें विलक्षण तेज असल्यामुळें त्यांचें शरीर उपासानें कृश तर झालें नाहींच पण तें उलट पूर्वींहून अधिक पुष्ट व तेजस्वी दिसूं लागले! अन्नास स्पर्शहि न

करतां हा मुलगा इतका तेजस्वी दिसतो यावरून हा कोणी तरी श्रेष्ठ योगी असला पाहिजे असा जाणत्या माणसांनीं तर्क बांधला.

बादशहानें दिलेल्या मुदतीचा शेवटचा दिवस येऊन ठेपला. दिगंबरपंतांकडून पैसे आले नाहींत. बादशहाला अतिशय आनंद झाला. त्यानें दासोपंतांना दरबारांत आणून उभें केलें. दासोपंत देहभानावर नव्हते. ईश्वरचिंतनांत ते संपूर्ण निमग्न होऊन गेले होते. बादशहा त्यांना मुसलमान होण्याचा हुकुम सोडणार इतक्यांत एक पाडेवार, खांद्यावर कांबळें, हातांत काठी अशा थाटानें दरबारांत हजर झाला.

त्या काळीं बादशहा आपण । पुसतसे त्या मनुष्यालागून ॥
अरे तूं कोठील ? कोण ? । कोणी तुजला धाडिलें ॥ १ ॥
येरू म्हणें ' दिगंबराचे सेवक । जाणून आम्हांस फार विश्वासुक ॥
हुंड्या देऊन आमुचे हस्तक । पाठविला असे सर्वस्व ' ॥ २ ॥
बादशा म्हणे, तूं चाकर । किती दिवसांचा निर्धार ॥
आणि नामही सत्वर । सांग आतां या काळीं ॥ ३ ॥
नाम तों दत्ताजी जाण । चाकर सप्त पिढ्यांपासून ॥
मुशारा पुसतां पूर्ण । बोले अन्नार्थी मी असें ॥ ४ ॥
त्यांनीं मजला टाकून । कदापि न राहती एक क्षण ॥
जागृति सुषुप्ती आणि स्वप्न । त्यांचे सन्निध मी असें ॥ ५ ॥

त्या महारानें द्रव्याची पिशवी दरबारांत रिकामी केली. कारकुनांनीं द्रव्य मोजून घेतलें. हिशेब बरोबर होता. नंतर पाहतात तों तो महार कोठेंच दिसेना. बादशहाची वेड्यासारखी स्थिति झाली. तो म्हणूं लागला:—

म्हणतसे दावा रे तो पाडेवार । यास्तव फुटतात कीं माझे नेत्र ॥
नेत्रांचें तेज साचार । तो मजला ऐसा पैं गमतो ॥ १ ॥
हुडका हुडका रे चहुंकडे । गेला गेला तो कोणीकडे ॥
सत्वर आणा रे दृष्टीपुढें । माझ्या आतां अविलंबें ॥ २ ॥

नंतर तो महार नक्की नाहींसा झाला अशी बादशहाची खात्री झाल्यावर तो निराश झाला. त्यानें दासोपंतांना वस्त्रालंकार देऊन सन्मानानें स्वगृहीं परत पाठविलें.

घरीं परत आल्यावर दासोपंतांनीं दिगंबरपंतांस आपल्या सुटकेची सर्व हकीकत सांगितली. दिगंबरपंतांनीं तर कोणासच पाठविलें नव्हतें. तेव्हां ही सारी पंढरीनाथाची कृपा होय हें ते उमजले आणि ईश्वराची त्यांनीं सद्‌गदित वाणीनें स्तुति केली. ही ईश्वरी लीला पाहून दासोपंत संसारांतून पूर्ण विरक्त झाले आणि मातापूर नांवाच्या दत्तस्थानीं निघून गेले.

× × ×

## जयरामस्वामी आणि श्रीशंकराचार्य

जयरामस्वामी हे रामदासपंचकांतील एक प्रसिद्ध संत होत. तीर्थयात्रा करीत करीत ते एकदां वडगांवला आले होते. नित्य प्रातःकाळीं सद्‌गुरूची कांकडआरती करावी व स्नान केल्यानंतर पुन्हां गुरुदेवतेची यथासांग पूजाअर्चा करावी असा त्यांचा नित्यक्रम होता. ते भजन करीत असतांना देव्हाऱ्यांतील मुरलीधराची मूर्ति नृत्य करीत असे, असें सांगतात.

एका दिवशीं श्रीशंकराचार्यांची स्वारी वडगांवच्या वेशीपाशीं आली. आचार्यांचे शिष्य गांवांत आले व त्यांनीं जयरामस्वामींच्या मठाची चौकशी केली. ते शिष्य नंतर स्वामींच्या मठापाशीं आले तों भजनाचा मोठा घोष त्यांच्यावर कानावर आला. शिष्य परत गेले व आचार्यांना त्यांनीं ही हकीकत निवेदन केली. मग आचार्यांनीं आपल्या चार शिष्यांस बोलावून सांगितलें, 'तुम्ही आतांच जाऊन जयरामबुवांना सांगा कीं शंकराचार्य तुमच्या गांवाच्या वेशीपाशीं आलेले आहेत. ते जगद्‌गुरु व तुमचेहि गुरु आहेत. तरी तुम्ही भजनाचें सोंग टाकून द्या आणि आचार्यांची पूजा करा. नाहींतर तुम्हांला दंड द्यावा लागेल.'

आचार्यांच्या आज्ञेप्रमाणें ते चारी शिष्य स्वामींच्या मठांत आले व त्यांनीं स्वामींना आचार्यांचा निरोप सांगितला. जयरामस्वामी त्या वेळीं भजन संपवून व गुरु-देवतेची आरती वगैरे आटोपून स्वस्थ बसले होते. आचार्यांचा निरोप ऐकून ते म्हणाले, 'शंकराचार्यांचें आम्हीं काय घेतलें आहे ! आम्हांवर दंड कशासाठीं बसवितात हें समजलें पाहिजे.'

ते शिष्य स्वामींना म्हणाले, 'शंकराचार्यांचें शिखासूत्र आणि यज्ञोपवीत हीं आपल्यापाशीं आहेत. तीं आम्हांकडे द्यावीं म्हणजे आम्ही जातों'

स्वामींनीं लगेच आपली शेंडी कापून व जानवें तोडून तीं त्या शिष्याच्या हवालीं केलीं. त्यांनीं तीं घेऊन व शंकराचार्यांकडे जाऊन सगळी हकीगत आचार्यांस सांगितली. आचार्य खूप रागावले. नंतर ते आपल्या शिष्यवर्गासह नदीवर स्नानास गेले. वाटेंत सर्वानुमतें असा बेत ठरला कीं, 'जयरामस्वामी भ्रष्ट झाला आहे. त्याला कोणी पंक्तीस घेऊं नये.' अशा अर्थाचीं पत्रें गांवोगांवीं पाठवावीं. मग नदीवर आल्यावर पाण्यांत बुड्या मारून स्नान करून वर येतात व पाहतात तों सर्वांच्या शेंड्या व जानवीं बेपत्ता झालेलीं ! सर्व मंडळी एका क्षणांत शिखाभ्रष्ट व यज्ञोपवीतभ्रष्ट होऊन गेली होती ! मग एकजण दुसऱ्यास म्हणतो, 'अहो जानवीं दुसरीं घालतां येतील, पण नव्या शेंड्या कुठून मिळणार तावडतोब ?'

शिष्यसमुदाय आचार्यांकडे आला. आचार्यांना आढळलें कीं सर्व शिष्य एकसहा संन्याशी झाले आहेत ! हा प्रकार कशामुळें झाला हें शोधून काढण्यासाठीं आचार्यांनीं समाधि लाविली. तेव्हां जयरामस्वामींचे गुरु कृष्णाप्पास्वमी यांचा आचार्यांना दृष्टांत झाला कीं, 'तुमच्या शिष्यांनीं माझा शिष्य जयराम याचा वृथा छळ केल्याबद्दल ही

शिक्षा झाली आहे. त्यांची क्षमा मागा म्हणजे तुमच्या शिष्यांच्या शेंड्या व यज्ञोपवीतें परत येतील !'

मग आचार्य आपल्या शिष्यांसह वडगांवीं जयरामस्वामीकडे गेले व स्वामींना शरण गेले आणि झाल्या अपराधाची क्षमा मागितली. त्यानंतर स्वामींच्या आज्ञेनुसार सर्वांनीं पावन तीर्थांत स्नानें केल्यावर सर्वांस पूर्ववत् शेंड्या व यज्ञोपवीतें प्राप्त झालीं.

× × ×

## गोपाळनाथ मळगांवकर यांची प्रेमभक्ति

अठराव्या शतकांत सावंतवाडीस गोपाळनाथ मळगांवकर नांवाचे एक संत होऊन गेले. सावंतवाडीच्या तलावाच्या कांठीं एकदां यांचा मुक्काम झाला असतां त्यांनीं केलेला चमत्कार सांगण्यासारखा आहे.

ते पावसाळ्याचे दिवस होते. आर्द्रानक्षत्र गेलें तरी पाऊस पडावा तसा न पडल्यानें पिकें वाळत चाललीं होतीं व दुष्काळाचा धोका उभा राहिला होता. सावंतवाडीचे राजे श्रीमंत खेमसावंत यांनीं शहरांत तलावाचे कांठीं, पर्जन्य पडावा म्हणून अनेक ब्राह्मण अनुष्ठानास बसविले होते, व शिवमंदिरांतून शंकरावर अभिषेक सुरू केला होता. हा प्रकार पाहून गोपाळनाथांनीं एका अधिकाऱ्याला विचारलें,

'हें अनुष्ठान कशासाठीं चालविलें आहे?' अधिकाऱ्यानें गोपाळनाथांना सर्व हकीकत सांगितली. त्यावर गोपाळनाथ म्हणाले,

'या उपायानें काय व्हायचें आहे ? सर्व विश्वाचें नियमन करणारा जो परमेश्वर, ज्याच्या आज्ञेनें सूर्यचंद्र उदयास्त पावतात, तो जर संतुष्ट होईल तर आतांच पर्जन्य वृष्टि होईल ! तरी त्याच्या नामाचा भक्तिप्रेमपुरःसर घोष करा.'

अधिकाऱ्यानें हा संवाद राजेसाहेबांना कळविला. राजेसाहेब सत्पुरुषांचें भुकेले असत. ते आपल्या अधिकाऱ्यांसह तात्काळ तेथें आले व त्यांनीं गोपाळनाथांना नमस्कार घातला. नाथांनीं राजास आशीर्वाद देऊन म्हटलें, 'अनुष्ठानानें पाऊस पडणार नाहीं. शहरांतील सर्व लोक येऊन ते श्रीपांडुरंग नामाचा घोष करतील तर लगेच पाऊस पडेल. राजेसाहेबांनीं अनुष्ठान बंद करण्याचा हुकूम दिला व नाथाज्ञेप्रमाणें सर्व लोक जमवून नाथांबरोबर हरिभजनाचा कडाका चालविला. भजनघोष सुरू होऊन दोन तास झाले नाहींत तोंच आकाशांत काळेभोर ढग दाटून आले आणि थोड्याच वेळांत पाऊस पडून सर्वत्र पाणीच पाणी होऊन गेलें. तलावहि तुडुंब भरला व दुष्काळाची भीति अगदीं नाहींशी झाली.

× × ×

## संत सोहिरोबा यांचा छळ

सावंतवाडीजवळ बांदें नांवाचें गांव आहे. तेथें सोहिरोबा अंबिये या संताचा जन्म झाला. गांवच्या कुळकर्णीपणाचें काम त्यांनीं बरींच वर्षे केलें होतें. वयाच्या पस्तिसाव्या वर्षी ते विरक्त बनले. त्यावेळीं सावंतवाडीच्या गादीवर श्रीमंत खेमसावंत हे असून ते अल्पवयी असल्यामुळें त्यांचे चुलते आबासाहेब हे राज्याचा सगळा कारभार पाहात असत. आबासाहेब हे अत्यंत दुष्ट, कपटी व मद्यपी होते. प्रजाजनांकडून पैसे वेळेवर वसूल न झाल्यास, 'सराफकट्टा' नांवाची एक जागा होती. तेथें गांवच्या कुळकर्ण्यांस नेऊन त्याचा छळ करावा, त्याच्या पोटावर जड जड दगड ठेवावे, प्रसंगीं त्याचा प्राणहि घ्यावा. असा जुलुम आबासाहेबांच्या अमदानींत चालत असे. एक वेळ बिचाऱ्या सोहिरोबांच्या पोटावरहि अशा प्रकारें दगड ठेवण्यांत आले होते. असें म्हणतात.

एके दिवशीं आबासाहेबांनीं सोहिरोबांस वाड्यांत बोलावून एका खोलींत कोंडून ठेवलें, आणि 'देव दाखव नाहींतर ठार करतों.' अशी त्यांना धमकी दिली. सोहिरोबांनीं अनन्यभावानें देवाचा धांवा केला. तोंच असा चमत्कार झाला कीं, त्या खोलीच्या भिंतींतून अकस्मात एका ज्वाळेचा लोळ उत्पन्न होऊन तिच्या तेजानें आबासाहेबांचे डोळे दिपून गेले. त्यांना आपल्या कृत्याचा पश्चात्ताप झाला व त्यांनीं सोहिरोबाना बंदीतून मुक्त केलें. जातांना सोहिरोबा त्यांना म्हणाले, 'आबासाहेब ! ती ज्वाळा ही परमेश्वराच्या क्रोधाचें चिन्ह होय ! आम्हां उभयतांतून कोणातरी एकाचा बळी घेतल्याशिवाय ही ज्वाळा आतां शांत होणार नाहीं.' असे सांगून सोहिरोबा गांवीं परत गेले. पुढें थोड्याच दिवसांत सोहिरोबांची भविष्यवाणी खरी ठरली. कांहीं कारणानें अत्यंत विषण्ण होऊन तोफेच्या दारूच्या पिंपावर बसून व स्वतःच आग लावून देऊन आबासाहेबांनीं कुडाळला आत्महत्या केली ! प्रचंड ज्वाळेनेंच त्यांचा बळी घेतला.

× × ×

## पूर्णदास उर्फ बाबा उसपकर

वेंगुर्लें येथें उभादांडा या ठिकाणीं पूर्णदास उर्फ बाबा उसपकर यांची समाधि व त्यांनीं बांधलेलें देवालय आहे. या संताचा एक चमत्कार सांगतों.

पूर्णदास केरी या गांवीं असतांना नेमानें भागवत वाचीत असत. याच गांवीं पडते नांवाच्या एका गृहस्थांकडून पूर्णदासांनीं भागवत लिहिण्याकरतां पांच रुपायांचे कागद उधारीवर आणले होते. बरेच दिवस होऊन गेले तरी हे पैसे द्यायचे राहिलेच होते. एकदां पडते यांचा धाकटा भाऊ पूर्णदासांकडे भागवत ऐकण्यासाठीं जात असतां 'बाबांना पैशाची आठवण कर' असें पडते यांनीं त्याला सांगितलें. पण भागवत ऐकून मन तद्रूप झालेला हा भाऊ निरोप सांगायला विसरला. असें अनेक वेळां झालें. अखेर वडील भाऊ त्याला याबद्दल एकदां पुष्कळ रागें भरला व 'आज निरोप न

सांगतां आलास तर उपाशी ठेवीन' अशी त्यानें धमकी दिली. त्यानंतर धाकटा भाऊ बाबांकडे गेला व त्यानें भीतभीत आपल्या कडील भावाचा निरोप त्यांना सांगितला. 'ठीक आहे. तुमचे पैसे परवां देतों' असें पूर्णदासांनीं त्याला सांगितलें. देवकर्मांत नित्य गढून गेल्यामुळें पूर्णदासांना पैशाची आठवण राहिली नाहीं व शेवटीं मुदतीचा अखेरचा दिवस तर येऊन ठेपला. तो दिवसहि निघून गेला. दुसऱ्या दिवशीं एक 'कुणबी' पडते सावकाराकडे गेला व त्याला म्हणाला, 'शेटजी! बाबांचा हिशोब काय झाला आहे तो काढा. मी त्यांच्याकडून पैसे घेऊन आलों आहें.' सावकारानें खातें उघडून पाहिलें व सांगितलें, 'कागदाचे पांच रुपये फक्त मला बाबांकडून येणें आहेत.' कुणब्यानें ते पैसे दिले व सावकाराची पावती घेतली.

इकडे पूर्णदास आपली स्नानसंध्या आटोपून नित्यक्रमानुसार गीता वाचण्याच्या उद्देशानें भगवद्गीतेची पोथी सोडून पाहतात, तो त्या दिवशीं त्यांना जो अध्याय वाचायचा होता, त्यांत ही पावती घालून ठेवलेली आढळली! त्यांना अतिशय आश्चर्य वाटलें. पावती पोथींत कशी आली? त्यांनीं घरांतल्या माणसांकडे चौकशी केली. पण कोणालाच कांहीं माहीत नव्हतें. नंतर सावकाराकडे जाऊन त्याला विचारतां तो म्हणाला,

'आज एक अनोळखी कुणबी येऊन त्यानें तुमचे पैसे चुकते केले आणि तो माझ्याकडून पावती घेऊन गेला.'

हें सावकाराचें भाषण ऐकतांच सर्वांची खात्री होऊन चुकली कीं, हे कृत्य मानवी नसून प्रत्यक्ष पंढरीनाथानें कुणब्याचा वेश घेऊन पूर्णदासांची अब्रू राखली!

× × ×

## शेख महंमदबाबांचा चमत्कार

चांभारगोंदें येथे शेख महंमद या नांवाचे प्रसिद्ध सत्पुरुष होते. त्यांना सप्रेम कीर्तन करण्यांत मोठा आनंद वाटे. व हरिनामाचा रात्रंदिवस छंद असे. ते एके दिवशीं कीर्तन करीत असतां मोठे मोठे पंडित व विद्वान ब्राह्मण व इतर वर्णांचे लोक यांची ऐकण्यास एकच गर्दी उडून गेली होती. कीर्तनाला अद्भूत रंग चढला होता. तों मध्येंच अकस्मात् बाबांनीं उडी मारून वरचा मंडप चोळला. हें पाहून लोकांना आश्चर्य वाटलें. जे लोक अगदीं पुढें बसले होते त्यांनी बाबांना विचारलें,

'आतां एकदम उडी मारून वरचा मंडप असा हातानें आपण कां चोळून टाकलात?' बाबा म्हणाले, 'वैष्णवांत शिरोमणि असे तुकाराम देहूगांवांत कीर्तन करीत आहेत. अशा वेळीं मंडपास अकस्मात् हिलाल लागून तो जळूं लागला हें पाहून इथूनच मीं मंडपास लागलेली आग विझवून टाकली.'

बाबांचें हें भाषण कोणास खरें वाटेना. ते म्हणाले, 'अहो, देहू गांव इथून कितीतरी दूर. असें असतां तुम्हांला तिथें लागलेल्या आगीची गोष्ट कशी समजली? बरें, आग लागलीच असेल तर ती विझवून टाकायचें तिथल्या श्रोत्यांपैकीं कोणालाच कसें सुचलें नाहीं?'

शेख महंमद म्हणाले, 'अरे, तें तुकारामांचें कीर्तन. तें ऐकणारास देहभान राहात नाहीं. अशा देहातीत झालेल्या श्रोत्यांना आग लागलेली समजावी कशी?'

त्यावर एकानें शंका काढली, 'असें म्हणतात कीं तुकारामाच्या कीर्तनांत प्रत्यक्ष पंढरीनाथ असतात. तर मग हें संकट त्यांनींच कसें निवारण केलें नाहीं?'

बाबा म्हणाले, 'त्याची स्थिति तर विचारूं नका. तो प्रेमानें वेडा होऊन गेलेला असतो. कीर्तनप्रसंगी ज्याला आपल्या देवपणाचा विसर पडतो तो लोकांचें संकट त्यावेळीं काय निवारण करणार! इतक्याउप्परहि तुम्हांला शंका असलीच तर देहूस मनुष्य पाठवून तेथील समाचार आणवा.'

तेव्हां 'रात्रीं तुकारामबाबांचें कीर्तन चाललें असतां जर कांहीं कौतुक पाहिलें असेल तर कृपा करून लिहून पाठवावें' अशा आशयाचें पत्र देहूच्या पाटलास एका श्रोत्यानें धाडलें. दुसऱ्या दिवशीं उत्तर घेऊन माणूस परत आला. त्यांत लिहिलें होतें, 'रात्रीं कीर्तनाचा गजर चालला असतांना मंडपावर अकस्मात् हिलाल उडून तो जळूं लागला. मंडपास दीडहात व्यासाचें छिद्र पडलें. परंतु कीर्तनांत सगळी मंडळी दंग असल्यानें त्यावेळीं कोणासच हा प्रकार ध्यानीं आला नाहीं. सकाळीं पाहतां छिद्र दृष्टीस पडलें; तेव्हां हा आगीचा प्रताप असावा असें लक्षांत येऊन सर्वांस आश्चर्य वाटलें.'

हें पत्र वाचून मंडळीची खात्री झाली आणि ते शेख महंमदबाबांच्या पायीं लागले.


# आर. एन्. शिंदे ॲण्ड सन्स्

चष्म्यांचे व्यापारी

मुख्य दुकान : २०७, गिरगांव रोड, मुंबई ४

शाखा : [ १ ] चामार बाग रोड परळ, मुंबई १२.

[ २ ] मुकुंद मॅनशन न. चिं. केळकर रोड, दादर, मुंबई २८

[ ३ ] ९२०-२१ सदाशिव, पुणें २

# श्रीसाईबाबा पादवंदन

**श्री**—आदि ज्यांचा । तया गजानना । करी मी वंदना । मनोभावें ॥ १ ॥

**सा**—ईबाबा दत्त । सत्य अवतार । करीं भवपार । नीज भक्त ॥ २ ॥

**ई**—श महादेव । ईश पुरुषोत्तम । ब्रह्मांडा व्यापून । अलगची ॥ ३ ॥

**बा**—प जगताचा । म्हणोनीया बाबा । चैतन्याचा गाभा । अविनाशी ॥४॥

**बा**—ह्य वेड्यापरी । आत्मारामीं दंग । जया न तो भंग । कालत्रयीं ॥ ५ ॥

**पा**—प ताप दैन्य । नुरे नाम घेतां । लाभवी स्वहिता । भक्ताचीया ॥६॥

**द्**—त्त अवतार । साई गजानन । सत्य हें मानून । भजा त्यांसी ॥ ७ ॥

**वं**—द्य सर्व धर्मा । जातभेद नसे । पाही तैसा दिसे । साईबाबा ॥ ८ ॥

**द्**—र्शनेची होई । वृत्ती तदाकार । केलीया निर्धार । कळों येई ॥ ९ ॥

**न**—मस्कार माझा । साईबाबा दत्ता । कृपाकर माथां । ठेवा माझ्या ॥१०॥

**—गणेश जगन्नाथ काळे**

# श्रीज्ञानेश्वर माउलीची ज्ञानोत्तर प्रेमभक्ति

लेखक : श्रीज्ञानेश्वर माउलीचा एक चरणरज

श्रीसाई-लीला अंक २, यामध्यें वरील ग्रंथावर वाङ्मप्रभु श्री. त्रिलोकेकर यांचा एक परीक्षणात्मक लेख आला आहे. ते सदयहृदय, रसिक व विद्वान संतभक्त आहेत. माझा व ग्रंथाचा प्रेमानें गौरव केल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें. त्यांच्या चरणीं सप्रेम प्रणिपात. त्यांनीं कांहीं दोषस्थळें दाखविलीं आहेत.

**कांहीं दोषस्थळें:**—'श्रीज्ञानेश्वरांचें तत्त्वज्ञान' ह्या प्रबंधाचा पूर्वेतिहास काय आहे ह्याच्याकडे लेखकाचें दुर्लक्ष झालेलें आहे. बरोबर आहे. ग्रंथांत कांहीं ठिकाणीं दुर्बोधता वाचकांचा रसभंग करते. बरोबर आहे. ग्रंथांत पुनरुक्तीचा दोष आहे. बरोबर आहे. साधक ज्या संप्रदायाचा असेल त्याच्या सांप्रदायिक निष्ठेवर आक्रमण करूं नये. बरोबर आहे. पण इतरांनीं आपल्या निष्ठेवर आक्रमण करून वाद लढविला असेल तर त्यांच्या मतांचें सप्रमाण परीक्षण करण्यास हरकत नाहीं. ज्ञा. १३-२४०, माउलींच्या या मताप्रमाणें मीं इतरांच्या मतांचें परीक्षण केलें आहे. श्री. त्रिलोकेकर यांनीं स्वामी रामकृष्ण परमहंस व शिरडीचे श्रीसाईबाबा ह्यांनीं भक्तांना वादविवादापासून दूर रहाण्याचा उपदेश केला, असें सांगितलें आहे. हा उपदेश अतिशय मोलाचा आहे. या दृष्टीनें वादविवादांत पडून माझ्याकडून चूक झाली व होत राहते, हें मी कबूल करितों.

**ग्रंथाचें उद्दिष्ट:**—श्री. त्रिलोकेकर म्हणतात, 'प्रस्तुत ग्रंथाचा उद्देश ज्ञानेश्वरींत शंकराचार्यांप्रमाणें ज्ञाननिष्ठा आहे कीं लेखकाच्या म्हणण्याप्रमाणें प्रेमलक्षणा भक्ति आहे, हा मुख्य वाद होय. अर्थात् पहिल्याच प्रकरणांत मुख्य वादाचा प्रश्न बाजूला ठेवून इतर गौण वाद घेणें हें विवेचनाच्या दृष्टीनें श्रेयस्कर नाहीं.' हें म्हणणें बरोबर नाहीं. हा वाद मुख्य मानून लेखक, डॉ. पेंडसे यांना सहमत झाले इत्यादि कडक मतें व इतर मतें श्री. त्रिलोकेकर यांनीं सांगितलीं आहेत. श्रीज्ञानेश्वरमाउलीनें अद्वैत ज्ञानानंतर प्रेमभक्ति ज्ञानेश्वरींत, अनुभवामृतांत व आपल्या अनेक अभंगांत सांगितली आहे, असें मीं ग्रंथांत दाखविलें आहे. पृष्ठ ४ पहा. ज्ञानेशांना श्रीशंकराचार्यांचें अद्वैत मान्य आहे, हें संत श्रीगुलाबरावमहाराजांचें मत डॉ. पेंडसे यांना व मला मान्य आहे. डॉ. पेंडसे अद्वैत ज्ञानानंतर ज्ञानेशांनीं प्रेमभक्ति मानिली नाहीं, ज्ञानेशांची ज्ञाननिष्ठा प्रेमभक्तिरहित आहे, असें म्हणतात. मीं त्यांच्या ह्या मताचें खंडण केलें आहे. पृष्ठ ८८, १६४, १९९, २६१, २६७, ३२५, ३७२, ३८४, ४३२, ४४८ पहा. माउलीची ज्ञाननिष्ठा प्रेमभक्तिरहित नव्हती; ज्ञाननिष्ठेनंतरहि श्रीकृष्णप्रेमनिष्ठा त्यांना परमप्रिय आहे; समाधीच्यापूर्वी नमनांत ज्ञाननिष्ठेनंतरहि आपल्या हृदयांत श्री. विठ्ठलप्रेमनिष्ठा आहे असें ज्ञानेशांनीं वर्णिलें आहे. हा मुख्य

उद्देश लक्षांत न घेतां श्री. त्रिलोकेकर यांनीं आपलीं मतें सांगितलीं आहेत. म्हणून तीं मतें बरोबर नाहींत. मला अद्वैतज्ञान व प्रेमभक्ति यांचा समन्वय करावयाचा असल्यामुळें डॉ. पेंडसे यांचें तंत्र वापरण्याची आवश्यकताच वाटली नाहीं. माझ्या मुख्य उद्दिष्टाला इतर गौण वाद साह्यभूत असल्यामुळें ते घेतले आहेत. जे वाद पुररुक्तीनें व पाल्हाळानें चर्चिलें आहेत असें तें म्हणतात ते माझे मुख्य वाद आहेत.

**अद्वैतवाद आणि विशिष्टाद्वैतवाद**—श्री. त्रिलोकेकर म्हणतात, 'आपल्या धार्मिक वाङ्मयांत अद्वैत, विशिष्टाद्वैत व द्वैताद्वैत हें मुख्य तीन वाद आहेत. श्रीमच्छंकराचार्य, श्रीरामानुजाचार्य आणि श्रीमध्वाचार्य हे तीन आचार्य ह्या वादांचे प्रणते आहेत. ह्यांपैकीं ज्ञानेश्वरींत अद्वैतवाद आणि विशिष्टाद्वैतवाद यांचा समन्वय केला आहे. परंतु ही समन्वयाची दृष्टि सोडून 'ज्ञानेश्वरींत अद्वैत कीं भक्ति ( म्हणजेच विशिष्टाद्वैतवाद ) आहे; हा वाद आजपर्यंत अनिर्णित राहिलेला आहे. ह्या बाबतींत जवळजवळ अद्वैत आणि भक्ती यांचा छत्तीसाचा आंकडा आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं.' ह्यापुढें त्यांनीं माझ्या मताचा विपर्यास केलेला दिसून येतो. ज्ञानेश्वरींत अद्वैताला भक्तीचें वावडें आहे, असें माझें मत नाहीं आणि, निवृत्ति–ज्ञानदेव–सोपान–मुक्ताबाई–एकनाथ–नामदेव–तुकाराम ह्या भागवतांना अद्वैत मान्य नाहीं, असेंहि माझें मत नाहीं. श्री. त्रिलोकेकर असें म्हणतात कीं, ग्रंथांतील भागवतधर्मसंप्रदायानुसार असलेलीं प्रकरणें डॉ. पेंडशांसारख्या ज्ञानवादी लोकांना मुळींच पटण्यासारखीं नाहींत. 'ज्ञानेश्वरींत शंकराचार्यांचा अद्वैतवाद आणि रामनुजांची भक्ति म्हणजेच विशिष्टाद्वैतवाद यांचा समन्वय आहे.' हें त्यांचें मत डॉ. पेंडसे यांना पटेल, असें त्यांना वाटतें काय ? मला वाटतें त्यांचें हें मत त्यांना मुळींच पटणार नाहीं. मीं माझ्या ग्रंथांत श्री. त्रिलोकेकरांप्रमाणें अद्वैतवाद आणि विशिष्टाद्वैतवाद यांचा समन्वय केला नाहीं. तत्त्वज्ञानदृष्ट्या विशिष्टाद्वैतवादाहून ज्ञानेशांचा अद्वैतवाद निराळा आहे.

'हा क्षत्रियाचेया आचारीं । पांचवा गुणेंद्र अवधारीं । चहूं पुरुषार्थां शिरीं । भक्ति जैसी ॥८६७–१८॥' ही पंचम पुरुषार्थाची भक्ति ज्ञानेशांनीं ज्ञानेश्वरींत सांगितली आहे. श्री. त्रिलोकेकर म्हणतात, 'पंचम पुरुषार्थ ही भाषा भागवत संप्रदायाची आहे. ह्या शब्दाचा ज्ञानेश्वरींत मागमूस सांपडत नाहीं.' पंचम पुरुषार्थ या शब्दाचा अर्थ आणि चहूं पुरुषार्थां शिरीं असलेल्या भक्तीचा अर्थ एकच आहे. त्याचप्रमाणें ज्ञानेशांनीं अनुभवामृतांतहि ज्ञानोत्तर भक्ति सांगितली आहे. येणें ज्ञानोत्तर भक्ति । दाखविली मधुराद्वैती । हा उपकार जाहला वेदान्तीं । अभूतपूर्व ॥ १८२-३॥ प्रे. नि. हा विशेष ज्ञानेशाच्या संप्रदायांतील साक्षात्कारी संतानेंच सांगितला आहे. ज्ञानेशांच्या सिद्धांताचें स्पष्टीकरण ज्ञानेशांच्या संप्रदायांतील ज्ञानेश्वरसाक्षात्कारी संत–वचनांच्या आधारें करणें श्रेयस्कर आहे म्हणून मला हा दंडक बरोबर वाटतो. कारण हा दंडक संप्रदायाच्या दृष्टीनें शास्त्रीयच आहे.

ज्ञा. १८–११३३ ह्या ओवींत ज्ञानेशांनीं समन्वय केला आहे. बरोबर आहे. मीं अनेक ठिकाणीं समन्वय केला आहे. रामकृष्णभक्ति, शिवभक्ति, शक्तिभक्ति यांचेंहि मीं समर्थन केलें आहे. श्री. त्रिलोकेकर म्हणतात, 'खुद्द प्रस्तुत लेखकांनीं ह्या ओवीवर केलेलें भाष्य अवास्तव आहे असें म्हणावें लागतें.' माझें या ओवीवरील भाष्य कसें अवास्तव आहे, मीं या ओवीचा अर्थ कसा चुकीचा केला आहे, हें त्यांनीं सांगावयास पाहिजे. समन्वयाचेहि प्रकार आहेत. यथार्थदीपिका अ. ९–११ श्लोकावर वामन पंडितांना चीडहि आली नाहीं, असें पृष्ठ १५७ मध्यें माझें एक वाक्य आहे. यावर ते म्हणतात, "वस्तुस्थिति उलट आहे. वामन पंडित चिडले, इतकेंच नव्हे तर 'गीता जाते पूर्वेकडे। टीका चढे पश्चिम पर्वताचे कडे.' असा टीकेचा कडाका ज्ञानेश्वरांविरुद्ध त्यांनीं उडवून दिला." हें म्हणणें बरोबर नाहीं. य. दी ९–११ या श्लोकावरील सर्व ओव्या पहा. या श्लोकावर ही ओवी नाहीं. ती य. दी. अ. ९ श्लोक ६ ओ. ६५५ ही ओवी आहे. म्हणून 'अवजानन्ति मां मूढा: ९–११' ह्या श्लोकावरील ज्ञानेश्वरांच्या भाष्यामुळें य. दी. ९–११ श्लोकांवर वामन पंडितांना चीडहि आली नाहीं हें माझें म्हणणें बरोबर आहे.

**कैवल्य व भक्तिः**—श्रीज्ञानेश्वरमाउलीची ज्ञानोत्तर प्रेमभक्ति, पृष्ठ ७३ चा उल्लेख करून त्यांनीं परस्परविरोधी विधानें दाखविलीं आहेत. हें पृष्ठ संपूर्ण वाचा. ज्ञा. १८–१२४३ ओवींत ज्ञान व चौथा पुरुषार्थ यांना ज्ञानेशांनीं प्राधान्य दिलें. त्याच पानावर ९–१३–१९२; १०–१०–१३१; १८–४३–८६७ ह्या ओव्यांत ज्ञानेशांनीं भक्तीला प्राधान्य दिलें. 'जया भक्तीची येतुली प्राप्ती। जे कैवल्यातें परौते सर म्हणती।' ज्ञानेश कैवल्यापेक्षां भक्तीवर विशेष प्रेम दाखवितात. त्यांनीं अज्ञाननिवृत्तीसाठीं ज्ञानाला प्राधान्य दिलें, आणि भक्तिसुखासाठीं ज्ञानापेक्षां भक्तीला श्रेष्ठ स्थान दिलें. श्री त्रिलोकेकरांनी 'चारी पुरुषार्थांच्या वरी। या पंचम पुरुषार्थांची पायरी' हें प्रमाण दिलें आहे. यावरून त्यांना ही ज्ञानेशांची भक्ति प्रिय वाटत असावी असें वाटतें. पण यासंबंधीं मला संशय वाटत असल्यामुळें त्यासंबंधीं अधिक चर्चा करीत नाहीं.

**अर्जुनाची प्रेमलक्षणा श्रीकृष्णभक्तीः**—श्री. त्रिलोकेकर म्हणतात, "गीतेंतील बाराव्या अध्यायांतील पहिल्या श्लोकांतील 'त्वां' ह्या पदावर प्रस्तुत लेखकांनीं जें केशपिंजण केलें आहे त्यांत अर्थवादापलीकडे जास्त तथ्यांश नाहीं.' हें मत सांगून त्यांनीं ज्ञानेश–संप्रदायांतील साधक भक्तांच्या सांप्रदायिक सगुण निष्ठेवर आणि अर्जुनाच्या ज्ञानोत्तर श्रीकृष्णभक्तिनिष्ठेवर अनुचित आक्रमण केलें, असें मला वाटलें. मी 'त्वां' ह्या पदाचा विचार सतराव्या प्रकरणांत केला आहे. श्रीकृष्णमूर्तीचा सामान्यत्वें पाहणाऱ्या मलिन दृष्टीचा अर्जुन निषेध करितो. दिव्यचक्षु अर्जुनाचा अनुभव यथार्थ असल्यामुळें (११–२९२) भगवंतांनीं बाराव्या अध्यायांत मोठ्या संतोषानें त्याच्या अनुभवाला मान्यता दिलेली आहे. **सर्वदा व्यापक असणारा भगवंतच श्रीकृष्णमूर्ति आहे, ११–२८९, असा अनुभव घेणाऱ्या अर्जुनाच्या ज्ञानोत्तर श्रीकृष्णप्रेमभक्तीचें माउलीनें ज्ञानेश्वरींत समर्थनच** केलें आहे, असा उपसंहार या प्रकरणाच्या शेवटीं केला आहे.

श्री. त्रिलोकेकर म्हणतात, 'भाष्यकारांतें वाट पुसतु, हें प्रकरण डॉ. पेंडशांच्या ग्रंथांतील अजिंक्य असा बालेकिल्ला आहे.' ज्ञानेश्वरींत अद्वैतवाद आणि विशिष्टाद्वैत यांचा समन्वय केला आहे, असेंहि त्यांचें मत आहे. डॉ. पेंडसे यांच्या तुलनेच्या निष्कर्षांवरून त्यांना श्री. त्रिलोकेकरांचें हें मत मुळींच मान्य होणार नाहीं. त्यांच्या अजिंक्य मताच्या दृष्टीनें श्री. त्रिलोकेकर हे स्वतःच्या मताला चुकीचें मत मानितात काय ? ते आपल्या स्वतःच्या मताला वास्तववाद म्हणतात; त्यांना माझ्या वरील मतांत अर्थवादापलीकडे जास्त तथ्यांश वाटत नाहीं. त्यांनीं वरील बालेकिल्ल्यांतील बारावा अध्याय वाचावा. सतरावें प्रकरण वाचावें. नंतर श्रीज्ञानेश्वरमाउलींना ज्ञानोत्तरप्रेम भक्ति मान्य आहे कीं नाहीं ? तें निर्विकारपणें त्यांनीं सांगण्याची कृपा करावी. ज्ञानी अक्षरोपासकाच्या ज्ञाननिष्ठेपेक्षां ज्ञानी सगुण भक्ताची प्रेमनिष्ठा ज्ञानेशांनीं, ज्ञा. १२–१७ १९५ ते १९६, श्रेष्ठ सांगितली हें मत ज्ञानवादी डॉ. पेंडसे यांना कां पटणार नाहीं ? डॉ. पेंडसे हे बुद्धिमान, विद्वान, व्यासंगी आणि, त्यांनीं मला पाठविलेल्या पत्रावरून, थोर हृदयाचे आहेत, असें मी मानितों. पण मला त्यांच्या मतापेक्षां स्वानुभवी संतांचें मत पूर्णपणें यथार्थ वाटतें. माझा यथार्थ शास्त्रीय दंडक श्री. त्रिलोकेकरांना बरोबर वाटत नाहीं, म्हणून ज्ञानेश्वरीच्या आधारेंच अर्जुनाची प्रेमलक्षणा श्रीकृष्णभक्ति अर्थवादात्मक नसून कशी यथार्थ आहे तें अल्पबुद्धयानुसार सांगतों.

**दिव्यचक्षुपूर्वीः**—ज्ञा. १०, ओंवी १४८, व ज्ञा. १०–१२ वरील ओंव्या पहा. ज्ञानी अर्जुन श्रीकृष्णाला पंचविसावा पुरुष परब्रह्म म्हणतो. ज्ञा. १०-२२१, २२२, २२७-नामधारक अर्जुन पूर्ण परब्रह्म कृष्ण हस्तगत झाल्यामुळें स्वानुभवी झाला. 'देख-तसें विश्व आघवें तुवां भरलें' असें तो भगवंतास म्हणतो. अशा प्रतीतीला अर्जुनानें वरलें, असें संजय म्हणाला. १०–२३१ व ११–२९ पहा. हें सर्वहि सर्वेश्वर आहे, ही हृदयाच्या आंतील प्रतीति बाहेर डोळ्यांना दिसावी, सर्वेश्वर बाहेर डोळ्यांना गोचर व्हावा अशी इच्छा अर्जुनाच्या मनांत उत्पन्न झाली. ज्ञा. ११–६७ व ७६ पहा. ब्रह्मरसानंदाचें सेवन करून परतत्त्वाचा अनुभव घेणारा अर्जुन भगवंतास म्हणतो–ज्ञा. ११–८१ ते ८४ पहा. आतां ज्याच्या संकल्पानें ही लोकपरंपरा होते आणि हारपते, ज्या स्थानास स्वतः तूं 'मी' असें म्हणतोस, जेथून ही द्विभुज व चतुर्भुज रूपें तूं वारंवार घेऊन येतोस, खेळ संपल्यावर ज्या ठिकाणीं क्षीरसमुद्रांतील **अवगणिया** म्हणजे सोंग किंवा मत्स्य, कूर्म ह्या बाहुल्या सांठवितोस, तें तुझें मुद्दल स्वरूप मला दाखव. तुझें आगाध विश्वरूप माझ्या डोळ्यांना दाखव. ह्यावेळीं अर्जुनानें चतुर्भुज मूर्तीला गौण मानिलें आहे. ह्यावेळीं त्यानें चतुर्भुज रूपाला अवग-णिया म्हणजे सोंग म्हटलें आहे. ह्यावेळीं त्यानें विश्वरूपाला चतुर्भुज रूपापेक्षां श्रेष्ठ मानून विश्वरूपावर आपलें प्रेम दाखविलें आहे. पुढें दिव्यचक्षु अर्जुन विश्वरूपाचे सोहळे भोगल्यानंतर श्रीकृष्णावर प्रेम दाखवितो. तेव्हां भगवंत व्यास 'बाहेरिसवडिया भंगीं' त्याचें कृष्णप्रेम पाहण्यासाठीं म्हणतात, ज्ञा. ११-६१४,६२९,६३० एथून कृष्णादिक अवतार होतात. हें विश्वरूप खरें आहे. कृष्णरूप खोटें आहे. 'प्रेम धरिसी

अवगणियेचें चतुर्भुज जें' या सोंगावर खरें प्रेम करूं नकोस. दिव्यचक्षुपूर्वी अर्जुनानें चतुर्भुजरूपाला अवगणिया म्हटलें. त्याचप्रमाणें भगवंत चतुर्भुज श्रीकृष्णाला अवगणिया म्हणतात आणि ११-६३६ त्याच्यावर वरपांगी प्रेम कर असें सांगतात. परंतु दिव्यचक्षु अर्जुन भगवंताचें मनोगत जाणून सर्वदा व्यापक असणाऱ्या चतुर्भुज श्रीकृष्णमूर्तीवर आंतरिक खरें खरेंच प्रेम करितो. दिव्यचक्षुपूर्वी तो व्यापक मुद्गल स्वरूपापेक्षां चतुर्भुज श्रीकृष्णाला गौण मानीत होता.

**दिव्यचक्षु अर्जुनः**—ज्ञा. ११-१५९ अर्जुन चर्मचक्षूंनीं विश्वरूप पाहूं शकला नाहीं. भगवंतानें त्यास दिव्य दृष्टि दिली. ज्ञा. ११-१७९ ते १८५, १९३. ज्या विश्वरूपापासून हे सर्व अवतार प्रगट होतात, तें विश्वरूप चतुर्भुज श्रीकृष्णानें अर्जुनास आपल्या ठिकाणीं दाखविलें. मागें बाळकृष्णानें यशोदेला आपल्या मुखांत चौदाहि भुवनें दाखविलीं होतीं. श्रीकृष्णाचा अनुग्रह झाल्यामुळें माया कोणीकडे आहे, अशी भाषासुद्धां अर्जुन आतां जाणत नाहीं. असें असतांनासुद्धां कांहीं विद्वान आतांची अर्जुनाची भूमिका कोवळ्या ज्ञानी भक्ताचीसुद्धां मानित नाहींत. त्याची ही भूमिका कोवळ्या ज्ञानीभक्ताची आहे, हें ज्ञानेशांच्या दृष्टीनें दिसून येतें. पुढें जें चतुर्भुज रूपडें होतें, तेंच चहूंकडे नानारूपानें मांडून राहिलें, असें अर्जुनानें पाहिलें. ज्ञा. ११-१९५; १९६. प्रथम त्यास स्वरूप समाधान प्राप्त झालें. लगेच तो आपले डोळे उघडतो, तेव्हां तो विश्वरूप पाहतो. याच दोन्ही डोळ्यांनीं सर्व विश्वरूप पाहण्याची त्यास इच्छा झाली होती. भगवंतानें अशाप्रकारें त्याचा सोहळा पुरविला.

ज्ञा. ११-२४५,-२५१ अष्टसात्विकभावापन्न अर्जुनाच्या अद्वैत ब्रह्मानंदाच्या अनुभवाकडे दुर्लक्ष करूं नये. ११-२५३ श्रीकृष्णानें आपल्या कृपादृष्टीनें त्याच्या सुखानुभवानंतर द्वैताचा सांभाळ केला. ज्ञा. ११-२८८ ते २९३ अर्जुन भगवंतास म्हणतो, एवढा मोठा विश्वाचा पसारा मांडणारा तूं कोण व कोणाचा आहेस? जेव्हां मीं हें पाहिलें, तेव्हां आमचा जो सारथी तोच तूं आहेस. येथें अर्जुन सर्वदा व्यापक असणाऱ्या स्वरूपापेक्षां चतुर्भुज श्रीकृष्णाला गौण मानीत नाहीं. विश्वरूप सांवळी चतुर्भुजमूर्ति होतें. चतुर्भुजमूर्ति विश्वरूप होतें. अर्जुन म्हणतो, आमच्याच दृष्टि सलेपा म्हणजे विटाळलेल्या आहेत. कारण त्या मुग्ध सांवळ्या चतुर्भुजमूर्तीला सामान्यत्वानें पहातात. आतां तो दृष्टीचा विटाळ गेला. तूं मला लीलेनें दिव्यचक्षु केलेस, म्हणून तुझा महिमा यथार्थपणें मला पाहतां आला. परंतु मकरतुंडाच्या मागील बाजूला जो तूं होतास, तोच तूं एवढें रूप झालास, हें मीं पक्कें ओळखलें. ज्ञा. ११-३०९. या अव्यय अविनाश सदतिसाव्या पुरुषाहून निराळा गौण असा श्रीकृष्ण आहे, असें अर्जुन आतां म्हणत नाहीं. दिव्य दृष्टीमुळें त्याला श्रीकृष्णाचा यथार्थ महिमा कळला. ज्ञा.११-५४१ व ५४३. अर्जुन म्हणतो, तूं उघडें परब्रह्म आहेस, पण मीं तुला सारथी केलें. तूं योग्यांचें समाधिसुख आहेस, हें मीं मुर्खानें कसें जाणलें नाहीं? आतां अर्जुन शहाणा ज्ञानी भक्त आहे. दिव्यचक्षु अर्जुनाचा हा स्वानुभव खोटा मानणें बरोबर होणार नाहीं. विश्वरूप पाहिल्यावर दिव्यचक्षु अर्जुन चतुर्भुज श्रीकृष्णास गौण समजत नाहीं.

ज्ञा. ११–५९४ ते ५९७; ज्ञा. ११–६०७ ते ६०८ ज्ञानोत्तर शहाणा अर्जुन चतुर्भुज श्रीकृष्णाला आपला प्रिय सिद्धांत मानितो. भगवंत त्यास गांवढिया म्हणतात. विश्वरूपास साच व कृष्णरूपास मिथ्या म्हणतात. पण अर्जुन आपलें कृष्णप्रेम गौण मानीत नाहीं. कारण त्यास विश्वरूपापेक्षां कृष्णाकृतीमध्यें अधिक लाभ दिसला. ज्ञा. ११–७०५ ज्ञानेशांना जगामध्यें श्रीकृष्णचरणचतुर असा एक अर्जुनच दिसला. ज्ञा. ११–७०१ व १२–२८. देवानें क्षणभर व्यापक विश्वरूप अंगिकारिलें, 'तें साचचि कीं कवतिक' हें जाणावया अर्जुनानें गीता. १२–१ हा प्रश्न विचारिला. 'त्वां'–तुला याचा अर्थ ज्ञानेशास कोणता अभिप्रेत आहे? गीतेंतील बाराव्या अध्यायांतील पहिल्या श्लोकांतील 'त्वां' ह्या पादावर मीं जें केशपिंजण केलें आहे, त्यांत अर्थवादापलीकडे तथ्यांश नाहीं, असें श्री त्रिलोकेकरांचें मत आहे. सर्वदा व्यापक असणारें परब्रह्मच चतुर्भुजमूर्ति श्रीकृष्ण आहे. असा अर्जुनाचा प्रिय सिद्धांत आहे. अर्जुनाच्या सिद्धांतानुसार 'त्वां' म्हणजे तुला–श्रीकृष्णाला असा अर्थ ज्ञानेशांना अभिप्रेत आहे. विश्वरूप दाखविणाऱ्या चतुर्भुज कृष्णाला संबोधून अर्जुनानें प्रश्न विचारला. ज्ञा. १२-१-२१ पहा. अर्जुन सततयुक्त कृष्णभक्तांना 'योगवित्तमः' समजतो. ज्ञा. १२-१-३४ जगद्बंधु भगवान् श्रीकृष्ण संतुष्ट होऊन ता. १२-२ व २९ मध्यें त्याच्या प्रश्नाचें अनुकूल उत्तर देतात. अर्जुनाच्या सततयुक्त योगवित्तम कृष्ण भक्तांना भगवंत नित्ययुक्त युक्ततमभक्त म्हणून संमती देतात. १२-३३. अर्जुनानें भगवंतास तत्त्वतः सांगा असें म्हटलें. अर्थात् भगवंतानें त्यास तत्त्वतःच उत्तर दिलें. म्हणून हें अर्जुनाचें व भगवंताचें मत अर्थवादात्मक नसून यथार्थच आहे. अर्थवाद म्हणजे काय? हें भगवंताचें तात्विक मत वास्तववाद आहे कीं नाहीं? ज्ञानेशांनीं ज्ञा. १२-१३. ते १९ मध्यें ज्ञाननिष्ठेनंतर ज्ञानी भक्त प्रेमभक्ति करितात हें मत सांगितलें कीं नाहीं? ज्ञानेशांची प्रमुख भूमिका ज्ञानी भक्ताची होती कीं नाहीं? ह्यासंबंधीं विचार केला असतां माझीं मतें बरोबर आहेत, असें विद्वान् भक्त श्री. त्रिलोकेकर यांना दिसून येईल. ते 'व्यतिरेकज्ञानी, ज्ञानीभक्त आणि जग असिकी वस्तुप्रभा' हें प्रकरण वाचनीय मानितात. त्यावरुन ज्ञानेशांना ज्ञाननिष्ठेनंतर प्रेमभक्ति मान्य आहे, हें मत त्यांना मान्य असावें असें वाटतें.

श्री. त्रिलोकेकरांनीं ज्ञा. १० व्या श्लोकावरील ज्ञानेशांच्या अध्यात्माच्या उदात्त काव्यांतील देवभक्ताच्या प्रेमाचें विलोभनीय दृश्य मोठ्या प्रेमानें सांगितलें आहे. त्यावरून ज्ञा. १२ व्या अध्यायांतील ज्ञानोत्तर देव–भक्ताच्या प्रेमभक्तीचें वर्णन त्यांना आवडत असावें असें मला वाटतें. ते व्यासंगी, बुद्धिमान् असून सदयहृदय व रसिक टीकाकार आहेत. त्यांनीं दाखविलेलें मुख्य वैगुण्य हें बरोबर नसलें तरी त्यांनीं भक्तांना जें मार्गदर्शन केलें, तें मला अतिशय मोलाचें वाटतें. समन्वयाच्या पद्धतीनें केलेलें ग्रंथ लेखन भक्तांना आनंदप्रद वाटतें, इत्यादि त्यांच्या विचारावरून त्यांच्या गोड भूमिकेची कल्पना करितां येते. त्यांच्या चरणीं सप्रेम प्रणिपात. श्रीसाईलीला त्रैमासिक' संपादकांनीं लेख छापण्याची इच्छा प्रांजलपणें व आनंदानें प्रदर्शित केली, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

---

# मराठी पद्यमय श्रीरामरक्षा

वि. के. छत्रे

## ध्यान

[ चालः—असार जीवित० ] ( फटक्याची )

बाहु जानुपर्यंत जयाचे धनु स्कंधिं शर पाठीला ।
पद्मासन घालूनि बैसला पीतांबरही जो ल्याला ।
नवपकंजदलसमान लोचन प्रसन्न मुद्रा हो ज्याची ।
वामांकस्थितसीतावदनीं स्थिरावली दृष्टी साची ।
कांति नीरदासमान नाना–भूषण–मंडित जटा शिरीं ।
अखंड ऐशा श्रीरामाचें सदा मानसीं ध्यान करी ॥
श्रीरामाचें चरित्र आहे विशाल शतकोटि श्लोकीं ।
महापातकें नष्ट कराया, समर्थ अक्षर एकचि कीं ॥ १ ॥

नीलोत्पलसम कांती श्यामल नयन जयाचे पंकजसे ।
सीता लक्ष्मण समवेत शिरीं जटामुकुट शोभून दिसे ॥ २ ॥

खड्ग–चाप–शर करिं पाठीशीं निषंग, दैत्यांतक विभुतें ।
रक्षाया जग देहधारि अज स्मरुनि अशा श्रीरामातें ॥ ३ ॥

अघनाशिनि कामदा करावी बुधें रामरक्षा पठण ।
रक्षो राघव शिर, दाशरथि करो कपालाचें अवन ॥ ४ ॥

कौसल्यासुत या डोळ्यांचें कौशिक–प्रियहि कानांचें ।
यज्ञरक्षिता या नाकाचें लक्ष्मणवत्सल वदनाचें ॥ ५ ॥

विद्यानिधि तो या जिव्हेचें भरतवंदितग्रीवेचें ।
खांद्यांचें दिव्यायुध तेंवी भग्नशिवधनू बाहूंचें ॥ ६ ॥

या हातांचें तो सीतापति, हृदय रेणुका–सुत–जेता ।
खरध्वंसि मध्याचें जांबवदाश्रय हो नाभित्राता ॥ ७ ॥

रक्षो सुग्रीवेश कटीतें सक्थितें हनुमंतस्वामी ।
राक्षस कुल विध्वंसक रक्षो रघुवर दोन्ही मांड्यांते ॥ ८ ॥

सेतुबांधिता गुडघे रक्षो दोन्हि पोटऱ्या दशमुख हा ।
पाय बिभीषणलक्ष्मीदाता राम देह संपूर्णतया ॥ ९ ॥

रामबलान्वित रक्षा ऐशी करि जो पुण्यात्मा पठण ।
सुखी चिरायू पुत्री विजयी विनायि होइ निश्चित जाण ॥ १० ॥
पाताली संचरोत कपटी आकाशीं वा भूवरती ।
रामनाम रक्षिता जनातें तें न पहायाही शकती ॥ ११ ॥
म्हणे राम वा रामभद्र वा रामचंद्र वा प्रेमभरे ।
पाप न लागे कदापि त्याला भोग भोगुनी शेखिं तरे ॥ १२ ॥
रामनाम हा मंत्र एकची विजयी व्हाया विश्वांत ।
धरी कंठिं तद्राक्षित त्याच्या सिद्धि सकलही हातांत ॥ १३ ॥
वज्रपंजराभिधान ऐसें रामकवच हें स्मरें सदा ।
अप्रतिहत सर्वत्र तदाज्ञा त्या जय-मंगल लाभ सदा ॥ १४ ॥
बुधकैशिक मुनि यातें स्वप्नीं हरें रामरक्षा कथिली ।
तथैव प्रातःकालीं जागृत होतां मुनिनें ती लिहिली ॥ १५ ॥
कल्पतरूंची बागचि, करि जो सकल संकटांचा अंत ।
त्रैलोक्या आनंदद आमुचा प्रभु तो राम श्रीमंत ॥ १६ ॥
तरुण रूपसंपन्न तसेची सुकुमार महाबली तसे ।
कृष्णाजिन वल्कलें नेसले विशाललोचन पंकजसे ॥ १७ ॥
कंद-मूल-फल अशन जयांचें ब्रह्मचारि नी तपि दान्त ।
राम नि लक्ष्मण भाऊ भाऊ दोघे दशरथभूपसुत ॥ १८ ॥
आश्रय सर्वहि जीवांचे जे श्रेष्ठ धनुंधारी, यांत ।
असुरवंशविध्वंसक राम नि लक्ष्मण आम्हां रक्षोत ॥ १९ ॥
अक्षय भात्यांतील, तीक्ष्ण शर लावुनि चापाला अपुल्या ।
चालोत पथी सदैव पुढती राम सतत मज रक्षाया ॥ २० ॥
चाप बाण तलवार करीं धरि सुसज्ज कवचें हीं तरुण ।
राम मनोरथ मूर्तिमंत जणुं करो लक्ष्मणासह अवन ॥ २१ ॥
शूर बली काकुत्स्थ रघूत्तम लक्ष्मण अनुयायी ज्याचा ।
दशरथ-कौसल्यासुत राम ब्रह्म पूर्ण हो तो साचा ॥ २२ ॥
वैभवशाली अतुल पराक्रमि यज्ञेश पती सीतेचा ।
वेदांताचा ज्ञेय विषय जो पुराण पुरुषोत्तम साचा ॥ २३ ॥
जपे भक्त जो भावें ऐसें नाम रातदिन होवो कां ।
पुण्य अश्वमेधाधिक लाभे त्यास यांत ना लव शंका ॥ २४ ॥
पद्मनयन दूर्वाश्यामल जो राम सुपितांबरधारी ।
स्तविति दिव्य या नामांनी ते मुक्त असूनी संसारीं ॥ २५ ॥
करुणासागर शांत गुणनिधी विप्रप्रिय राजश्रेष्ठ ।
सत्यवचन श्यामवर्ण सुंदर लोकानंदद धर्मिष्ठ । ॥ २६ ॥

रघुकुलदीपक रावणशत्रू राघव सीतेचा नाथ ।
लक्ष्मणअग्रज दाशरथी त्या रामा माझा प्रणिपात ॥
रामभद्र वा रामचंद्र वा वेधा अथवा हो राम ।
सीतेचा पति, नाथ तथा ! त्या रघुनाथातें नमन मम ॥ २७ ॥

रघुनंदन रामा श्रीरामा भरताग्रज रामा नमन
रणनिष्ठुर रामा श्रीरामा करीं सदा माझें अवन ॥ २८ ॥

रामपदातें स्मरे मानसीं वर्णि वाणिनें तच्चरण
रामपदांवरि ठेवी शिर मी रामपदातें मी शरण ॥ २९ ॥

माय रामजी पिता रामजी सखा राम राम स्वामी
सर्वस्वचि मम राम दयाळू नेणें नेणें दुसरें मी ॥ ॥ ३० ॥

दक्षिण भागीं भ्राता लक्ष्मण उत्तर भागीं जनकसुता
पुढति मारुती, करितों प्रणती ऐशा त्या श्रीरघुनाथा ॥ ॥ ३१ ॥

रघुकुलनाथ जनां आनंद रणीं धीर पंकजनयन ।
मूर्तिमंत करुणा नि दयाळू त्या श्रीरामा मी शरण ॥ ३२ ॥

श्रेष्ठ बुद्धिमान् जनीं जितेंद्रिय प्रजव जेंवि वायू नि मन ।
वायुपुत्र वानरप्रमुख जो रामदूत त्या मी शरण ॥ ३३ ॥

राम राम हीं मधुर अक्षरें कविताशाखेवरि बसुनी ।
गोड गोड बोले तो कोकिळ नमितों मी वाल्मीकिमुनी ॥ ३४ ॥

हरुनि आपदा सकल संपदा जो निजभक्तांतें देतो ।
आनंदद लोकां श्रीरामा पुनः पुन्हां त्या मी नमितों ॥ ३५ ॥

रामनाम गर्जतां जळूनी जातीं भवबीजें पार ।
मिळे सुखश्री भरे कांपरें यमदूतांतें साचार ॥ ३६ ॥

राजांचा राजा जो विजयी सदा, भजे त्या रामाला ।
असुरसैन्य निर्दळिलें जेणें नामितों त्या श्रीरामाला ।
रामाविण ना दुजा आसरा मी श्रीरामाचा दास ।
लीन सदा मन रामीं राहो श्रीरामा उद्धरि यास * ॥ ३७ ॥

राम राम म्हणतां गे गिरिजे मनास वाटे आराम ।
श्रीविष्णूच्या सहस्रनामीं तुळे एकची हें नाम ॥ ३८ ॥

**छत्रे**-वंशज **केशव**-तनयें **विश्वनाथ** नामें प्रेमें ।
मूळ पाहुनी मग हें रचिलें स्फूर्ति दिली त्या श्रीरामें ॥

---

* (मला)

# भक्तांच्या माहितीसाठीं--

## शिर्डी संस्थान व्यवस्थापक-समितीच्यानिवडणुकीबाबत-

शिर्डी येथील श्रीसंस्थानच्या व्यवस्थापक समितीची निवडणूक यंदा व्हावयाची आहे. सुधारलेल्या योजनेप्रमाणें व्यवस्थापक-समितीच्या सभासदांच्या जागा पुढील-प्रमाणें राहतील. पांच विश्वस्त, मुंबई प्रांतांतील आश्रयदात्यांकरितां एक राखीव जागा, मुंबई प्रांताखेरीज इतर प्रांतांसाठीं तीन जागा व मुंबई प्रांतांतील सभासदांसाठीं १० जागा, मिळून एकंदर १९ सभासदांची व्यवस्थापक-समिति राहील. निवडणूक दर तीन वर्षांनीं होईल व मतदानाची पद्धत विभागणी-पद्धतीनें राहील. प्रत्येक निवडणुकीच्या वेळीं, विश्वस्ताच्या जागेवर सर्वात जास्त दिवस घालविलेल्या विश्वस्ताची जागा खालीं करून त्या जागेवर नवीन विश्वस्ताची निवड करण्यांत येईल. जागा खालीं करून दिलेल्या विश्वस्तास निवडणुकीसाठीं उमेदवार म्हणून उभें राहाण्याचा अधिकार राहील. ही पहिलीच निवडणूक असल्यामुळें न्यायमंदिराच्या आदेशाप्रमाणें या वर्षी विश्वस्ताची निवड न होतां सध्यां असलेलेच पांच विश्वस्त राहतील.

× × ×

### श्रीसाईबाबांची मूर्ति

व्यवस्थापक-समितीनें ठरविल्याप्रमाणें श्रींची संगमरवरी दगडाची मूर्ति, मुंबईतील सुप्रसिद्ध शिल्पकार श्री. तालीम हे तयार करीत असून, ती मूर्ति यंदाच्या पुण्यतिथीच्या उत्सवाच्या सुमारास तयार करून देण्याचें त्यांनीं आश्वासन दिलें आहे. त्याप्रमाणें ती मूर्ति तयार झाल्यास शिर्डी येथें श्रींच्या समाधीवर यंदांच्या पुण्यतिथीच्या उत्सवप्रसंगीं, त्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यांत येणार आहे. त्यासाठीं व्यवस्थापक-समितीची जोराची खटपट चालू आहे. मूर्तीस शोभेल अशी पार्श्वभूमी समाधिमंदिरांत मूर्तीच्या पाठीमागें तयार करण्याचें काम चालू आहे.

× × ×

### शिर्डींतील सोयीसंबंधीं कांहीं सूचना

प्रत्येक उत्सवप्रसंगी कांहीं भक्त उत्सवापूर्वीच ७।८ दिवस येऊन शिर्डी येथील जागा अडवीत असतात, व त्यामुळें बऱ्याच भक्तांचा गैरसमज होत असतो. या बाबतींत व्यवस्थापक-समितीनें, विनापरवानगी तीन दिवसांपेक्षां जास्त दिवस राहूं

देऊं नये असा निर्णय घेतला असून त्याचें कडक अवलंबन करण्यांत येणार आहे. तरी भक्तांनीं उत्सवापूर्वी जाऊन जागा अडवूं नये. जागा अडविल्यास ती जागा खालीं करून दुसऱ्या भक्तांस द्यावी लागेल, त्यावेळीं उत्सवाची सबब वगैरे चालणार नाहीं. कांहीं भक्त उत्सवा अगोदर पत्र पाठवून अगर तार करून जागा राखण्यासाठीं कळवीत असतात. जागा राखून ठेवण्याचा प्रघात नसल्यामुळें राखीव जागा ठेवण्यांत येणार नाहींत; तरी भक्तांनीं जागा राखण्यासाठीं पत्रें पाठवूं नयेत; पाठविल्यास त्यांची दखल घेणें शक्य होणार नाहीं.

भोजनगृहाच्या बाबतींत देखील ज्या पंक्तीचीं तिकीटें देण्यांत आलीं असतील त्याच पंक्तीस हजर राहण्याची कृपा करावी. त्या पंक्तीचे भक्त हजर नसल्यास त्यानंतरच्या पंक्तीच्या भक्तांस भोजनास सोडण्यांत येत असतें व त्यामुळें भक्तांत उगाच गैरसमज उत्पन्न होऊन या बाबतींत बऱ्याच तक्रारी येत असतात. तरी ज्या पंक्तीचीं तिकीटें दिलीं असतील त्याच पंक्तीस हजर राहावें, अशी सर्वांना विनंती आहे. श्रींच्या दर्शनाच्या वेळीं धक्काबुक्की न करतां शिस्तींत ओळीनें दर्शन घेतल्यास गोंधळ न माजतां थोडक्या वेळांत सर्वांना दर्शन होईल. आरतीच्या वेळीं देखील विशेष गोंगाट न करतां आरतीचें गांभीर्य राखण्याची सर्वांस विनंती आहे. दिवसेंदिवस भक्तांची रीघ शिर्डीस वाढत असल्याकारणानें त्याचा फायदा बरेच स्वार्थसाधू लोक घेत असतात व त्यामुळेंच थेट मनमाड स्टेशनपासून तों शिर्डीपर्यंत चोरांचा व खिसेकापूंचा सुळसुळाट चालू असतो; तरी त्यांपासून प्रत्येकानें सावध राहून आपल्या वस्तूबद्दल दक्षता बाळगावी.

× × ×

## भक्तांना सावधगिरीचा इशारा

श्रीसाईनाथ फायनान्सियल कॉर्पोरेशन लिमिटेड, या नांवाची एक कर्ज देणारी संस्था निघाली असून त्या बाबतींत बऱ्याच लोकांकडून विचारणा करण्यांत येत असते. तरी सर्व भक्तांस कळविण्यांत येतें कीं, त्या संस्थेशीं शिर्डी संस्थानचा कोणत्याहि प्रकारचा संबंध नाहीं. मुंबईत व इतर ठिकाणीं श्रीसाईबाबांच्या नांवावर बऱ्याच संस्था निघाल्या असून त्या संस्थांचे सभासद झाल्यास शिर्डी संस्थानचें सभासदत्व प्राप्त होतें, असा बऱ्याच भक्तांचा समज झालेला दिसतो. तरी या बाबतींत देखील खुलासा करावासा वाटतो कीं, त्या संस्थांशीं शिर्डी संस्थानचा कोणत्याहि प्रकारचा संबंध नसून शिर्डी संस्थान ही संस्था या सर्वांपासून अलिप्त आहे व त्याचें सभासदत्व देखील वेगळेंच आहे. डहाणू जिल्ह्यांत चिंचणी येथें चिंचणकर ट्रस्ट तर्फे जें एक देवालय आहे त्या देवालयाशींच शिर्डी संस्थानचा संबंध असून तो फक्त त्या ट्रस्टप्रमाणें त्या ट्रस्टच्या उत्पन्नापैकीं ¾ उत्पन्न शिर्डी संस्थानास प्रतिवर्षी मिळतें एवढ्यापुरताच आहे; बाकी कोणत्याहि संस्थेशीं शिर्डी संस्थानचा कोणत्याहि प्रकारचा संबंध नाहीं, हा खुलासा करावासा वाटतो.

## या फंडगुंडांपासून सावध

श्रींचे आपण परमभक्त असून, शिर्डी संस्थानास आपण बऱ्याच देणग्या दिलेल्या आहेत, तसेंच शिर्डी संस्थान व्यवस्थापक-समितीचे आपण सभासद अगर विश्वस्त आहोंत, किंवा शिर्डी संस्थानशीं आपला अगदीं निकटचा संबध आहे, वगैरे वगैरे भुलथापा देऊन कांहीं लोक फंड गोळा करीत असतात. तरी शिर्डी संस्थान व्यवस्थापक-मंडळानें फंड गोळा करण्याचा कोणासहि अधिकार दिलेला नाहीं व अशा फंडांशीं संस्थानचा संबंध नाहीं. कांहीं लोक आपण बाबांचे भक्त असून सध्यां अतिशय संकटांत आहोंत, करितां आपणांस कांहीं मदत करावी व ती मदत परत करण्यांत येईल, वगैरे सांगून बऱ्याच भक्तांना फसवीत असतात. तरी अशा मूलथापांवर विश्वास न ठेवतां त्यापासून सावध राहावें अशी सर्वांस सूचना आहे. अशा प्रकारच्या बऱ्याच लोकांच्या फसवणुकी झालेल्या असून त्याबद्दल आमच्याकडे तक्रारी आल्या असल्यामुळें हा खुलासा करणें भाग पडत आहे.

**द. ब. राणे**
स. चिटणीस

## शिरडी संस्थानचे सभासद व्हा

सर्व साईभक्तांना आमची प्रेमाची विनंती आहे कीं, त्यांनीं शिरडी येथील श्रीसाईबाबा संस्थानचे सभासद होऊन बाबांच्या कार्यांत सहभागी व्हावें.

संस्थानचे आश्रयदाते होणारास रु. ५०० शुल्क
,, आजीव सभासद ,, ,, १०० ,,
,, सामान्य ,, ,, ,, ५ ,, वार्षिक

### सभासदास खालील अधिकार मिळतात

१ रामनवमी, गुरुपौर्णिमा व पुण्यतिथीचा प्रसाद घरपोंचता मिळतो.
२ निवडणुकीच्या वेळीं मतदानाचा, व समितीचा सभासद ह्या नात्यानें उमेदवार म्हणून उभें रहातां येतें.
३ सर्वसाधारण सभेंत हजर राहून संस्थानच्या कारभाराबद्दल सूचना किंवा प्रश्न विचारण्याचा अधिकार प्राप्त होतो.
४ संस्थानचा वार्षिक अहवाल घरपोंचता मिळतो.

'श्री साईबाबा संस्थान २५ बँक स्ट्रीट, कोट, मुंबई नं. १' ह्या पत्त्यावर दोन आण्यांचा स्टॅम्प पाठविल्यास सभासदाच्या अर्जाचा तक्ता पाठविला जाईल.

**--चिटणीस**




## मे १९५४

श्री सद्‌गुरु साईसमर्थांचे दर्शनास येणाऱ्या भाविक भक्तजनांची संख्या या महिन्यांत फारच मोठ्या प्रमाणावर होती. त्यांतले त्यांत हा महिना सर्वसाधारणपणें रजेचा असल्यामुळें भाविकांची गर्दी अतिशयच होती.

या महिन्यांत झालेले अनेक कार्यक्रम पुढीलप्रमाणें :—

**गायनः**—सौ. इंदुमतीबाई चौबळ (मुंबई), सौ. प्रफुल्लता रघुविर मडकईकर; सौ. गंगुबाई हनगल व कुमारी कृष्णा हनगल; श्री. शाम बाबू फाटक (मुंबई) श्री. कृष्णराव सिद्ध (श्रीगोंदा).

**काव्यगायनः**—कवि किसनराव सावंत आणि पार्टी यांचे कार्यक्रम सतत तीन दिवस झाले.

**नृत्यः**—कु. कांचन आर. भट (वय वर्षे ९); कु. ललिता भालचंद्र सोमणे.

**प्रवचनः**—वाङ्मय-प्रभु श्री. खंडेराव सदाशिव त्रिलोकेकर यांचें श्री ज्ञानेश्वरी-वर सुश्राव्य प्रवचन (मुंबई)

**कीर्तनः**—ह. भ. प. चंदुलाल कटके (सोलापूर).

**वादनः**—श्री. भगवंतराव वाघमोरे (बडोदा).

या महिन्यांत शिरडीचें हवामान उत्तम होतें.

संस्थानतर्फे चालविण्यांत येणाऱ्या धर्मार्थ दवाखान्यांत या महिन्यामध्यें १५३० लोकांना उपचार करण्यांत आले.

### दवाखान्यास मिळालेली देणगी

डॉ. आर. जी. बनाजी, रु. २१–४ आ. ० पै

## जून १९५४

श्री समर्थ साईमाऊलीचे दर्शनास या महिन्यांतहि बऱ्याच दूरदूरच्या सर्व जातीच्या भक्तांची रीघ सारखी चालू होती.

खालील कलावंतांनीं श्रींच्या पुढें हजेरी दिली:—

**कीर्तन**—श्रीसंत कैकाडीबुवा यांचे शिष्य भाऊराव; श्री. ह. भ. प. बाबा कर्वे; श्री. ह. भ. प. विठ्ठलराव मराठे यांचें संगीत भजन.

**गायन**—सौ. शालिनीबाई नार्वेकर ( मुंबई ).

ता. ३०–६–५४ रोजीं सूर्यग्रहणानंतर श्रींचे समाधींस दही, दूध, अत्तर गुलाब इत्यादि सुगंधी द्रव्यांनीं स्नान घालण्यांत आल्यानंतर श्रींची आरती करण्यांत आली.

या महिन्यांत संस्थानच्या धर्मार्थ दवाखान्यांत १६०० रुग्णांवर उपचार करण्यांत आले.

शिरडचिें हवामान उत्तम होतें व पावसाची सुरवातहि चांगली होती.

# जुलै १९५४

या महिन्यांत गुरुपौर्णिमा ( व्यास–पूजा ) व चंद्रग्रहणाचा योग एकाच दिवशीं आल्यानें श्रीसाईनाथांचे दर्शनास येणाऱ्या भक्तांची संख्या फारच मोठ्या प्रमाणावर होती. अनेक भक्तांकडून श्रींस देणग्या, नाना तऱ्हेच्या वस्तू अर्पण करण्यांत आल्या.

याच महिन्यांत श्रींचा गुरुपौर्णिमा–उत्सव संस्थानतर्फें मोठ्या थाटांत साजरा झाला. त्यांची हकीगत अन्यत्र दिली आहे.

# ऑगस्ट १९५४

या महिन्यांत अतिवृष्टीमुळें बाहेरगांवांहून येणाऱ्या भक्तांची गैरसोय झाल्यानें गर्दी विशेष नव्हती.

खालील कलावंतांनीं आपआपल्या कलांची हजेरी श्रींपुढें दिली: —

**कीर्तन**—ह. भ, प. गजानन लक्ष्मणराव मोडक ( रायपूरकर ); श्री. संत कैकाडीबुवा यांचे शिष्य भाऊराव; ह. भ. प. विठ्ठलराव मराठे यांनीं खालील प्रसंगांवर कीर्तनें केलीं:–( १ ) स्वातंत्र्यदिन ( २ ) अहिल्याबाई होळकर यांचे पुण्यतिथीनिमित्त ( ३ ) श्री. गोकुळअष्टमी, कृष्णजन्मोत्सवानिमित्त ( ४ ) एकादशी निमित्त.

**गायन**—श्री. रामभाऊ कठाणे ( वर्धा ); श्रीमती जानकीबाई अय्यर ( पुणें ).

**वादन**—तुळसीदास बनशीदास बैरागी यांचें दिलरुबा व सतार.

शिरडीचें हवापाणी उत्तम आहे. पाऊस समाधानकारक.

श्रींच्या धर्मार्थ दवाखान्याचा फायदा सुमारें १५०० लोकांनीं घेतला.

# श्री गुरुपौर्णिमा–उत्सव

श्री सच्चिदानंद सद्‌गुरु साईनाथमहाराज यांचा गुरुपौर्णिमा–उत्सव सालाबादप्रमाणें ता. १४ जुलै पासून ता. १६ पर्यंत संस्थानतर्फे शिरडी येथें साजरा करण्यांत आला.

ता. १५–७–५४ हा दिवस मुख्य उत्सवाचा होता. त्याच दिवशीं चंद्रग्रहण असल्यामुळें धार्मिक विधीचा सर्व भक्तांस लाभ घेतां यावा म्हणून पहांटे ४ वाजल्यापासून दुसऱ्या दिवशीं ११ वाजेपर्यंत श्रींचे समाधीस अभिषेक करण्यास मुभा ठेविली होती. रात्रौं श्रींच्या रथाची मिरवणूक वाजत गाजत श्री–नामाचा जयघोष करीत गांवांतून निघाली. नेहमींप्रमाणें रथासमोर गारुडांचा कार्यक्रम झाला व उत्तम प्रकारचें दारूसामान उडविण्यांत आलें.

श्रींचें मंदिर व गुरुपादुकास्थान येथें उत्तम तऱ्हेची रोषणाई करण्यांत आली होती.

ता. १५ रोजीं ह. भ. प. डॉ. गव्हाणकर व श्रीयुत बाबूराव देव यांचें कीर्तन झालें. अनेक कलाकार भक्तांनीं आपआपल्या कलेची बाबांसमोर हजेरी देऊन रात्रभर जागर केला.

दुसरे दिवशीं, म्हणजे आषाढ वद्य प्रतिपदा (शुक्रवार ता. १६–७–५४), कालाकीर्तन होऊन उत्सव समाप्त झाला. उत्सवप्रसंगीं संस्थानचे विश्वस्त स. चिटणीस, स. खजीनदार व कार्यकारी मंडळांतील इतर सभासद हजर राहून जातीनें उत्सवाची देखरेख ठेवीत होते. त्याचप्रमाणें संस्थानच्या नोकर वर्गानें उत्सवाच्या सर्व दिवसांत अहोरात्र खपून आटोकाट परिश्रम केले. त्याचप्रमाणें स्वयंसेवकांनीं उत्तम तऱ्हेनें काम केलें. पोलिस बंदोबस्ताहि फारच उत्तम होता. एस्. टी. चे डिव्हिजनल मुख्य अधिकारी श्रीयुत ले. कर्नल भैयासाहेब दिवाणजी हे नाशिकहून मुद्दाम बसगाड्यांची व्यवस्था जातीनें पाहण्यासाठीं उपस्थित असल्यामुळें त्यांनीं खास स्पेशल गाड्या सोडून भक्तांची ने–आण करण्याची व्यवस्था चांगल्या प्रकारें ठेविली होती.

अशा प्रकारें गुरुपौर्णिमा उत्सव–उत्तम प्रकारें साजरा करण्यांत आला.

द. ब. राणे,
सन्मान्य चिटणीस.

# साधनेचा अभ्यास

श्रीरामकृष्ण परमहंस यांचा भक्त 'एम्.' यानें आध्यात्मिक साधनेसंबंधीं विचारलेले कांहीं प्रश्न आणि भगवानांनीं त्यांना दिलेलीं उत्तरें येथें दिलीं आहेत. ही चर्चा साधक भक्तांना अत्यंत उद्‌बोधक वाटेल.........

**एम्.**—साधनेचा अभ्यास सबंध जन्मभर करावा लागतो काय ?

**भगवान्**— नाहीं. पण प्रारंभीं मात्र साधकानें पुष्कळ परिश्रम केले पाहिजेत. मागाहून इतक्याश्या कठोर तपस्येची गरज राहात नाहीं. लाटा, वादळें, किंवा नदीचें वळण या ठिकाणीं नावाड्याला सुकाणूं बळकट धरून ठेवावें लागतें. पण यांमधून गेल्यावर तो सुकाणूं सैल सोडतो. वारा अनुकूल आहे असें आढळलें म्हणजे मग तो आरामशीर बसतो आणि सुकाणूंला फक्त हात लावून असतो. नंतर तो शीड उभारायच्या तयारीला लागतो. आणि शेवटीं चिलीम भरूं लागतो. त्याचप्रमाणें कामिनी व कांचन यांचीं वादळें व लाटा यांचें उल्लंघन करून साधक पुढें सरकला म्हणजे त्याला शांति आणि आनंद यांचा लाभ होऊं लागतो.

कांहीं माणसें योग्यांचीं लक्षणें घेऊनच जन्माला येत असतात. त्यांनाहि काळजी घेणें जरूर असतें. कामिनी-कांचन हाच एक मोठा अडथळा आहे. साधकांना योगमार्गापासून भ्रष्ट करण्याचें आणि त्यांना संसाराच्या जाळ्यांत गुरफटवून ठेवण्याचें कृत्य कामिनी-कांचनामुळें होत असतें. कधीं त्यांना सुखाची थोडी इच्छा असते. ही इच्छा तृप्त करून ते परत आपलें चित्त परमेश्वरावर लावतात आणि योगाचरणाला युक्त अशी मनःस्थिति प्राप्त करून घेतात.

मासे पकडण्यासाठीं 'सत्क-काल' नांवाचा सांपळा तयार करतात तो तूं कधीं पाहिला आहेस का ?

**एम्.**—नाहीं, भगवान्, मीं पाहिलेला नाहीं.

**भगवान्**—आमच्या भागांत तो वापरतात. कळकाचें एक टोंक जमिनींत पुरून ठेवलेलें असतें. दुसऱ्या टोंकाला गळ लावून तें टोंक वांकवितात. गळाला आमिष

लावलेलें असतें. माशानें आमिष गिळलें कीं तो वांकलेला कळक एकदम सुटून सरळ होऊन ताठ उभा राहातो.

तागडीचें उदाहरण घे. एका पारड्यांत वजन घातलें कीं तागडीच्या वरच्या दोन कांट्यापैकीं खालचा कांटा वजनाच्या बाजूनें खूप झुकतो. खालचा कांटा हें आपलें मन होय. वरचा कांटा हा ईश्वर. या दोहोंची भेट हा योग. मन निश्चल झालें नाहीं तोंवर योगप्राप्ति नाहीं. आपल्या मनाला संसाराचें वारें सदोदित चाळवित असतें. मेणबत्तीची ज्योत वाऱ्यानें सारखी हलावी तसें संसारामुळें आपलें मन सारखें अस्थिर असतें. ही ज्योत अगदीं निश्चल राहिली म्हणजे योग साध्य झाला म्हणून समजावें.

योगसाधनाच्या मार्गांत कामिनी–कांचन हाच एक अडथळा असतो. आपण जें कांहीं पाहतों त्याचें नेहमीं पृथक्करण करीत असावें. स्त्रीच्या देहांत एवढें काय आहे ? रक्त, मांस, मेद, आंतडी हेंच ना ? अशा देहाचा मोह वस्तुतः कां पडावा ?

त्यागाचा अभ्यास करण्यासाठीं मी केव्हां केव्हां राजस वृत्ति धारण करीत असें. एकदां जरतारी वस्त्रें धारण करण्याची मला इच्छा झाली; बोटांत एक आंगठी घालावी आणि हुक्का घेऊन आरामांत गुडगुड करीत धूम्रपान करावें, असेंहि मनाला वाटलें. माथुरबाबू माझ्यासाठीं ह्या सगळ्या वस्तू घेऊन आला. मी तो जरतारी अंगरखा घालून बसलों. थोड्या वेळानें मी म्हणालों, 'मना ! जरतारी अंगरखा म्हणतात तो हा बरं !' नंतर मीं तो काढून फेंकून दिला. मला तो अंगावर सहन होईना. परत मी म्हणालों, 'मना ! शाल शाल ती ही ! ही आंगठी, नि हा हुक्का !' मीं या सर्व वस्तु नंतर फेंकून दिल्या; आणि त्यानंतर त्या वस्तूंचा मोह माझ्या चित्तांत कधींहि उत्पन्न झाला नाहीं.'

तिन्हीसांजा होत आल्या होत्या. ईशान्येच्या पडवींत भगवान् आणि एम्. हे दोघेचजण बोलत उभे राहिले होते.

**भगवान्**—(एम्.ला) योग्याचें मन सदैव ईश्वरावर स्थिर झालेलें असतें. तें सदैव आत्मचिंतनांत निमग्न असतें. अशा माणसाकडे नुसती नजर जातांच तो चटकन् ओळखूं येतो. त्याचे डोळे ताठ उघडे असले तरी दृष्टि शून्य असते; मादी अंडीं उबवीत असतांना तिची जशी दृष्टी असते तशी योग्याची शून्य दृष्टी असते. मादीचें सर्व लक्ष अंड्यावर असतें आणि तिच्या डोळ्यांत एक तऱ्हेची शून्यता असते. असें एखादें चित्र तूं मला दाखवूं शकशील का ?

**एम्.**—मी मिळविण्याचा प्रयत्न करीन.

संध्याकाळ झाल्यामुळें देवळादेवळांत दीप पेटले होते. श्रीरामकृष्ण आपल्या खोलींतील पलंगडीवर बसून कालीमाताचें ध्यान करीत होते. नंतर ते ईश्वरनामांचा उच्चार करूं लागले. खोलींत धूप घातला होता व एक समई लावून ठेवली होती. कालीमंदिरांत संध्याकाळची आरती सुरू झाली व शंख आणि तास यांचा

आवाज कानावर येऊं लागला. टिपूर चांदणें पडलें होतें व प्रकाशानें दाही दिशा भरून गेल्या होत्या. भगवान् एम्. ला परत म्हणाले—

**भगवान्**—आपलीं कर्तव्यें निःस्वार्थी बुद्धीनें करावीं. विद्यासागरनीं जें कार्य अंगिकारलें आहे तें चांगलें आहे. आपलीं कर्तव्यें करीत असतांना फळाची अपेक्षा न ठेवतां तीं करण्याचा यत्न करावा.

**एम्.**—होय महाराज. पण एक विचारूं का? आपलीं कर्तव्यें करीत असतांना माणसाला ईश्वरदर्शन होईल काय? 'राम' आणि 'काम' यांचें एकत्र अस्तित्व शक्य आहे काय? परवां मीं एका हिंदी दोह्यामध्यें वाचलें, 'राम आहे तिथें काम नाहीं, काम आहे तिथें राम असणार नाहीं.'

**भगवान्**—एकूणएक माणसें कर्म करतात. याला अपवाद नाहीं. देवाचें नाम-संकीर्तन करणें हें देखील एक कर्मच आहे. 'सोऽहम्'चें ध्यान करणारा अद्वैती हाहि तें ध्यानाचें कर्मच करीत असतो. श्वासोच्छ्वास करणें हेंहि कर्मच होय. कर्माचा निःशेष त्याग हा कोणालाहि शक्य नाहीं. म्हणून कर्म करावें पण त्याचें फळ ईश्वराला अर्पण करून मोकळें व्हावें.

**एम्.**—महाराज, मीं अधिक पैसा मिळविण्याचा उद्योग करावा काय??

**भगवान्**—धार्मिक कुटुंबाचा चारितार्थ चालविण्यासाठीं धनसंपादनाचा उद्योग करण्यास हरकत नाहीं. प्रामाणिक मार्गानें अधिक पैसा मिळविण्याचा तूं उद्योग केलास तर चालेल. जीवनाचें अखेरचें उद्दिष्ट मात्र धनसंपादन हें नसून ईश्वरसेवा हें आहे. पैसा हा ईश्वरसेवेच्या कारणीं लागत असेल तर त्याच्यापासून अपाय होत नाहीं.

**एम्.**—आपल्या बायकामुलांसाठीं माणसानें श्रमलें पाहिजे; या त्याच्या कर्तव्याची मर्यादा केव्हां संपते?

**भगवान्**—जोंपर्यंत त्यांना अन्नवस्त्राची गरज भासते तोंपर्यंत त्यांचा प्रतिपाळ करणें हें माणसाचें कर्तव्य आहे. पण मुलगा कर्तासवरता व मिळवता झाला म्हणजे त्याच्याबाबतचें बापाचें कर्तव्य संपतें. पिल्लूं स्वतः दाणे टिपूं शकत नाहीं तोंवरच त्याची आई त्याच्या चोंचींत अन्न आणून घालते. पण पिल्लूं आपलें अन्न मिळवायला समर्थ होऊनहि आईजवळ येईल तर ती त्या पिल्लाला टोंचून घालवून लावतें.

**एम्.**—माणसानें कर्तव्य कुठवर करावें?

**भगवान्**—झाडाला फळ धरलें म्हणजे मोहोर आपोआप गळून पडतो. ईश्वर-प्राप्ति झाल्यानंतर माणसाला कर्तव्य असें कांहीं उतरत नाहीं, कर्तव्य करावें अशी आसहि त्याच्या चित्तांत राहात नाहीं.

# श्रीसाई लीला 'त्रैमासिक' मिळण्याचीं ठिकाणें

(१) **श्री. बाबुराव डी. बागवे,**
चीफ एजंट, खटाव बिल्डिंग, गिरगांव नाका, मुंबई ४

(२) **श्री. बोवलेकर,** दादर बी. बी. स्टेशन समोर, मुंबई.

(३) **श्री. सावळाराम खंडू दांगट,** शिरीबंदर, मुंबई.

(४) **श्री. इ. आर. मालपेकर,**
दागिन्यांचें दुकान, जितेकर चाळ, ठाकूरद्वार, मुंबई २

(५) **श्री भाऊ मोरोबा ढगे,**
टोप्यांचे व्यापारी, ठाकूरद्वार मुंबई २.

६) **मेसर्स मनोहर बुक डेपो,**
गोखले सोसायटी लेन, पोयबावडी, परेल, मुंबई १२.

(७) **मेसर्स ठकार आणि कंपनी,**
कोहिनूर सिनेमा समोर, रानडे रोड, दादर, मुंबई २८.

(८) **धी बॉम्बे बुक डेपो,** गिरगांव. मुंबई ४,

(९) **मेसर्स सारंग बुक डेपो.**
मुनीम हाऊस, चिंचपोकळी, मुंबई १२.

(१०) **मेसर्स दातार आणि पुरोहित,**
वैद्यवाडा, बॉम्बे रोड, ठाणें.

(११) **मेसर्स मंगला वस्तु भांडार,**
अहिल्याबाई चौक, कल्याण.

(१२) **पनवेल न्यूज पेपर स्टॉल,** पनवेल

(१३) **नाडकर्णी आणि कं.** ( स्पोर्टस् )
**खेळाच्या वस्तूंचे व्यापारी,** धोबीतलाव, मुंबई, १.

(१४) **श्री बाबुराव अण्णाराव चौगुले,**
२५२ ठळकवाडी, बेळगांव.

(१५) **न्यू मनोहर बुक डेपो.** गोखले सोसायटी लेन, पोयबावडी, परळ, मुं. १२

(१६) **विजयकुमार परफ्यूमरी स्टोअर्स,** कोतींकर मार्केट पहिली गल्ली,
दुकान नं. १८ दादर, मुंबई.

बाहेरगांवीं एजंट्स नेमणें आहे, तरी मुंबई ऑफिसच्या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा